अर्ध्या मैलाच्या रपेटीसाठी चार आणे....

रोज तीस ते पन्नास मैल रपेट....

केवढी स्वस्ताई !

कलकत्ता दिनांक



# माणूस

१९ जुलै ६९ । चाळीस पैसे

१९ जुलै १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक : सातवा

**संपादक : श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे   वार्षिक वर्गणी : वीस रुपये   परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

'माणूस'सारख्या प्रतिष्ठित व दर्जाविषयी दक्ष राहणाऱ्या साप्ताहिकाने आपल्या स्तंभलेखनात कुचाळखोरीला वाव द्यावा, याविषयी खेद आणि आश्चर्य वाटून सोबतचे पत्र लिहावयाला मी प्रवृत्त झालो. त्याला प्रसिद्धी देऊन दुसरी बाजू ध्यानात घेण्यास आपण तयार असता हे दाखवून द्याल, अशी मला खात्री आहे.


जुलै, ७ — **दिलीप पुरुषोत्तम चित्रे**

['दुसरी बाजू' ध्यानात घेण्यास, योग्य वाटल्यास तिला प्रसिद्धीही देण्यास 'माणूस' तयार असतो हे 'दाखवून' देण्याची अवश्यकता भासत नाही. यापूर्वी अनेकदा 'माणूस'च्या वाचकांना हे सहजच 'दिसलेले' आहे.

आपले संपूर्ण पत्र व 'ग्यानबा'ची त्यावरील विस्तृत प्रतिक्रिया पुढील अंकी येत आहे. —सं. ]

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# मुंबई समाचार



सु. ल. सोमण

## दोन आगळे संप

मुंबईकरांना संपाचे नाविन्य आता तसे राहिलेले नाही. संप, बंद, मोर्चे, सत्याग्रह ही मुंबईच्या बहुढंगी जीवनाची जणू अपरिहार्य अंगच बनून राहिली आहेत. ह्या गोष्टींचे नाविन्य राहिले नाही, तसेच त्यांच्याविषयीचे आश्चर्यही आता लोपलेले आहे. आणि असे असूनही, नुकत्याच संपलेल्या दोन संपांबाबत मुंबईस अनेकविध प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या – बहुतेक सगळ्या आश्चर्य-औत्सुक्य मिश्रित ! तब्बल सतरा-अठरा दिवस चालून, स्टेट बँकेच्या दुय्यम अधिकाऱ्यांचा आणि सरकारी हॉस्पिटलांतील ' डॉक्टरां 'चा असे दोन्ही संप मागच्या आठवड्यात मिटले-मिटवले गेले ! कामगार, झाडूवाले-कनिष्ठ, झोपडीवाले, व क्वचित् कारकून मंडळी ह्यांचेच आर्थिक प्रश्न असतात. त्यांचेच झगडे बव्हंशी पहायची सवय झालेल्यांना, उच्च मध्यम-वर्गात मोडणाऱ्या ह्या मंडळींच्या संपाने आश्चर्याचा धक्काच दिला असल्यास नवल नाही. आणि म्हणूनच मी वर म्हटले की, संपांचा नित्यनियमित सराव असणाऱ्या मुंबईकरांना 'बड्या' मंडळींच्या ह्या संपांविषयी एक वेगळे औत्सुक्य होते. त्याचमुळें अनेकांनी ह्या संपांविषयी आपापल्या प्रतिक्रिया नोंदवल्या. 'संप' म्हटला, की सर्वसामान्य माणसाचा त्याला प्राय: विरोधच असतो. कामगार, झाडूवाले आदींच्या संपाचे वेळी, त्यांच्या संपाला विरोध असला तरी त्यांच्या परिस्थितिविषयी सर्वसाधारणपणे सहानुभूती असलेली आढळून येते. ह्यावेळी मात्र सर्वसामान्य माणसाची साधी सहानुभूतिही ह्या संपवाल्यांना मिळालेली नव्हती. स्टेट बँकेतल्याच एका कनिष्ठ कर्मचाऱ्याची प्रतिक्रिया ह्या दृष्टीने फार बोलकी होती. " काय कामं असतात ह्या बड्या धेंडांना, त्यांना मिळणाऱ्या पगाराच्या मानाने ? चुका झाल्याच तर त्याचे माप आमच्या

पदरात घालायचे एवढेच ! आणि थोडेसे काम जास्त पडलेच, तर त्यांना, त्यांच्या कामाच्या मानाने पगारही जास्त असतोच की. " स्टेट बँकेच्या संपामुळे व्यावहारिक अडचणीत सांपडलेला, एका कंपनीचा वरिष्ठ अधिकारी सांगत होता, " बेटे ज्यादा वेळ काम करावे लागते म्हणून ओरडतात. पण ऑफिसच्या नेमलेल्या वेळात ह्या लोकांनी व्यवस्थित काम केले तर ह्यांना ज्यादा वेळ कामच करावे लागणार नाही ही वस्तुस्थिती आहे. " डॉक्टरलोकांच्या संपाविषयी काय प्रतिक्रिया असाव्यात, ह्याची मुबईतल्या सरकारी रुग्णालयांचा, तिथल्या अंदाधुंदी कारभाराचा परिचय असणाऱ्यांना वेगळी कल्पना देण्याचा प्रश्नच नाही !

अशा ह्या आगळचा संपांची कारणेही भिन्न होती, नेहमीप्रमाणे निव्वळ आर्थिक नव्हती. स्टेट बँक कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षी नियमाप्रमाणे काम करायला सुरुवात केली. त्यानंतर, बँकेच्या व्यवस्थापकांनी चार अधिकाऱ्यांवर कारवाई केली. त्यातून हे संप प्रकरण उद्भवले, आणि संपाचे लोण देशभर पसरले. ह्या सरकारी बँकेतल्या संपामुळे इतर बँकांतली कामेही थंडावली, व्यापारी, कारखानदार, प्रत्यक्ष शासन ह्यांचीही कुचंबणा होऊ लागली. एक प्रकारे आर्थिक नाड्याच आवळल्या गेल्या. बँक व्यवस्थापक व शासन ह्यांनी मात्र हा प्रश्न खंबीरपणे हाताळला, आणि कुठल्याही पूर्व अटींविना कर्मचाऱ्यांना त्यांचा संप मागे घ्यावा लागला. बँक नियमांनुसार, ज्यांच्यावर कारवाई केली होती, तीही मागे न घेण्याचे शासनाचे खंबीर धोरण निश्चितच स्वागतार्ह होते, कारण एकदा का शासनाने ह्या संपात पडते धोरण स्वीकारले असते, तर त्याचे परिणाम इतरत्रही तावडतोब दिसून आले असते, व आंदोलनांची नवी तरच उभी राहिली असती. ह्या अविचारी संपांनी बँक कर्मचाऱ्यांनी काय साधले हे समजणे मात्र कठीण आहे.

डॉक्टर लोकांच्या संपाची परिस्थिती थोडी भिन्न होती. सरकारी रुग्णालयांतल्या हाऊसमेन व रजिस्ट्रारना विद्यावेतन कमी मिळते, राहणे, जेवण-खाण आणि सोयी व्यवस्थित नसतात ह्या कारणामुळे हा संप पुकारण्यात आला होता, आणि ह्या त्यांच्या तक्रारीही त्यांनी शासनापुढे अनेकवेळा मांडल्या होत्या विद्यावेतनाव्यतिरिक्त इतर प्रश्नांकडे सरकारने दुर्लक्ष का करावे हे समजू शकत नाही. ह्या अडचणी वेळीच पूर्ण केल्या गेल्या असत्या (आणि ते सरकारला अगदी सहज शक्यही होते) तर कदाचित् संपाचा हा दुर्दैवी प्रकार घडलाच नसता, व सरकारी–निमसरकारी रुग्णालयांवर अवलंबून असणाऱ्या असंख्यांना जीवघेणे हालही सहन करावे लागले नसते. एवढे असूनही डॉक्टरांनी संपाचे पाऊल उचलावे हे मात्र मनाला पटत नाही. विद्यावेतनाचा प्रश्न ह्या मंडळींना लहानशा कालावधिपुरताच असतो. त्यानंतरचे भविष्य काय असते हे सांगायची आवश्यकताच नाही. शिवाय, नागरी आरोग्याच्या त्यांच्यावर टाकलेल्या जबाबदारीचे स्वरूप पाहता, सरकारी–चुकीचे माप सरकारच्या पदरात टाकूनही डॉक्टरांच्या संपाचे समर्थन होऊ शकणार नाही. आणि

गोर–गरीब बिनवशिल्यांच्या रुग्णाईतांना ह्या मंडळींकडून मिळणाऱ्या वागणुकीचे किस्से ऐकले की ह्याच्या संपाविषयी चीडच मनात उभी राहते !

उच्च मध्यमवर्गीयांनी लढे उभारले म्हणून ही टीका होता आहे असा गैरसमज होण्याची शक्यता आहे. ह्या वर्गाचेही आज काही प्रश्न आहेत, नाहीत असे नाही. परंतु ह्या मंडळींकडून जबाबदार, जाणीवपूर्ण वागणुकीची अपेक्षाही समाज बाळगत असतो. आणि म्हणूनच ह्या मंडळींनी आपले प्रश्न असलेच तर, ते सोडविण्यासाठी अधिक समजूतदार मार्ग चोखाळायला हवे होते. त्यामुळे इतर समाजाला मार्गदर्शन मिळायला हवे होते. पण घडले नेमके उलटे. संप निदर्शने वगैरेसारखे 'स्वस्त' मार्गच हाताळून त्यांना उरलीसुरली सहानुभूती मात्र गमावली ! ह्या लढ्यांना, सर्व विरोधी पक्षियांनी पाठिंबा दर्शवून आपल्या संधिसाधू वृत्तीचे प्रदर्शन करण्यापलिकडे काही साधले आहेसे वाटत नाही.

## पूर्वेचा दौरा

जपान, इंडोनेशियाचा दौरा आटोपून श्रीमती इंदिरा गांधी नुकत्याच परतल्या जपानने आर्थिक मदत सुरू केल्याची घोषणा केली, अधिक आर्थिक मदतीचे, औद्योगिक सहकार्याचे आश्वासन दिले. प्रे. सुहार्तोनी पाकिस्तानविषयक लढ्यात अलिप्त भूमिका स्वीकारून माजी प्रे. सुकार्नोची चूक सुधारली, भारताबरोबर अधिक सहकार्याची इच्छा प्रदर्शित केली. पंतप्रधानांच्या दौऱ्याची यशस्विता सांगताना ह्या दोन गोष्टींचा पुन:पुन्हा उच्चार करण्यात आला. काही राजकीय प्रश्नांची चर्चा करण्यात आली. तरी प्राय: हे दौरे आर्थिक प्रश्नांवर विचारांची देवाण घेवाण करण्यातच खर्च झाले. त्यांतही जपानकडून आम्हाला सहकार्य हवे होते, तर इंडोनेशियाला सहकार्य द्यायला आम्ही उत्सुक होतो. ह्या दोन्ही बाबतीत श्रीमती इंदिराजींना यश आले आहे. विशेषत: जपानच्या बाबतीत भारताला मदत देताना जपान नेहमीच साशंक असे. आशियात जपानबरोबर स्पर्धा करू शकेल असा भारत हाच एक देश आहे हेच त्याचे एक प्रमुख कारण होते. भारताला जपानशी स्पर्धा नव्हे, तर सहकार्यच केवळ करायचे आहे हे पटले म्हणूनच जपानने भारताला मदत द्यायचे मान्य केले हे उघड आहे. आर्थिक बाबींचा विचार करता श्रीमती गांधींच्या दौऱ्याचे हे यशच मानावे लागेल. इंडोनेशियाला भारताकडून सहकार्य हवे असले, व भारताला अनेक पद्धतींनी ते देता येणे शक्य असले, तरी त्याबाबत काही निश्चित तत्त्वे मात्र उभय नेत्यांनी सध्या तरी आखली नाहीत.

ह्या दौऱ्यात श्रीमती गांधींना काही प्रश्न ठिकठिकाणी विचारले गेले. त्यांतला एक म्हणजे, चीन अण्वस्त्र सिद्ध होत असताना, भारत अण्वस्त्र बनवेल की नाही ?

व दुसरा म्हणजे आशियाई सुरक्षिततेचा प्रश्न, पहिल्या प्रश्नाला 'नाही' असे अगदी निःसंदिग्ध उत्तर श्रीमती गांधींनी दिले. आणि त्याचे कारणे देताना त्यांनी सांगितले, की तूर्त तरी चीनकडून भारताला मोठा धोका नाही. एका अर्थी त्यांचे उत्तर यथार्थच मानले पाहिजे. एकतर, चीन सध्या आपल्या प्रबळ शेजाऱ्याबरोबरच्या भांडणात गुंतला आहे. त्याशिवाय अमेरिकेविरुद्धची आघाडीही त्याला सांभाळावी लागत आहे. त्यांतच भारताविरुद्ध सर्वंकष युद्ध म्हणजे ह्या बड्या राष्ट्रांनाही युद्धाला आमंत्रण हे ओघानेच आले. आणि तेवढे धाडस काही चीनला पेलवणार नाही हे उघडच आहे. तेव्हा तूर्त तरी मोठ्या संघर्षाच्या भरीस न पडता, केवळ सीमा धगधगती ठेवण्याचे आणि सीमेवरच्या नागा, मिझो, नक्षलवादी आदींना चिथावणी देऊन भारतात अराजके धुमसत ठेवण्याचेच राजकारण चीनला खेळणे भाग आहे. त्याच्याच जोडीला पाकिस्तानला भारताविरुद्ध कांगावा करत राहायलाही चीन प्रोत्साहन देत राहणार हेही उघड ! अर्थातच ह्या साऱ्यामुळे, अण्वस्त्र नाही, तरी लष्करी दृष्ट्या भारताला अधिकाधिक सज्ज राहावे लागणार आहे. ही वस्तुस्थिती मान्य करूनच भारताच्या संरक्षणाचा विचार झाला पाहिजे. प्रसंगी मुसंडी मारण्याचेही सामर्थ्य भारताला प्राप्त करून घेतलेच पाहिजे !

आशियाई संरक्षणाच्या प्रश्नानेही अलीकडे असेच महत्त्वाचे स्वरूप धारण केले आहे. सिंगापूर, मलेशिया, हिंदी महासागर इत्यादी क्षेत्रातून ब्रिटनने आपले आरमार काढून घेतल्याने व विएतनाम प्रश्नातून यशस्वी माघार घ्यायला अमेरिकेने सुरुवात केल्याने, आशियाई सुरक्षिततेच्या ह्या प्रश्नाला विशेष धार आली आहे. भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, इराण ह्यांची आघाडी उघडून व हिंदी महासागरात प्रत्यक्ष तळ देऊन, ब्रिटन-अमेरिकेने रिकामी केलेली जागा भरून काढायचा प्रयत्न रशियाने सुरू केला आहे. ह्या प्रयत्नांचा रोख अर्थातच, चीन-विरोधात आहे. तर चीनही ह्या पोकळीचा फायदा घेऊन, स्वतःचे वर्चस्व निर्माण करायचा प्रयत्न करीत आहे. विएतनाम वगैरे भागातून व्यापारी आघाडी चीनने मारली आहेच. पाकिस्तानातील उलथापालथीचा फायदा घेऊन, तिथल्या सरकारच्या धोरणाचा लाभ उठवून पाकिस्तानातही चीन आपले बस्तान बसवू पाहात आहे. कश्मीर-सिकीयांग रस्ता बनवून थेट कराचीपर्यंत व तिथून पुढे अरबी समुद्रात झेप घ्यायचा विचार करीत हिंदी महासागराकडेही तो लक्ष ठेवून आहे. आजच्या घडीला तरी पर्यायी जबरदस्त शक्ती अस्तित्वात नाही, आणि म्हणूनच रशिया–चीन स्पर्धेचे रण ह्या भागात माजण्याची शक्यता आहे. ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानानी 'भारत–ऑस्ट्रेलिया–जपान' ह्या युतीने ही पोकळी भरून काढून रशिया–चीनला दूर ठेवण्याची योजना मांडली होती. परंतु तिला फारसा प्रतिसाद भारताकडून मिळालेला नाही. ह्या परिस्थितीत आशियाई संरक्षणविषयक प्रश्न विचारले जावेत हे साहजिकच होते. परंतु कुठलेही निश्चित उत्तर पंतप्रधानांनी दिलेले नाही, प्राप्त परि-

स्थितीत, वरील तीन राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली, आशियाई राष्ट्रांची आघाडीच आर्थिक–राजकीय आघाड्यांवर रशिया-चीन-अमेरिका ह्या तिन्ही साम्राज्यशाह्यांवर नियंत्रण ठेवू शकेल. आशियाई राष्ट्रांच्या विकासाच्या दृष्टीने, ह्या तिन्ही राष्ट्रांचा आशियातला संघर्ष टाळणे आजच्या घटकेला आवश्यक झाले आहे, नि त्याचा मार्ग चोखाळण्याची जबाबदारी ह्या राष्ट्रावरच आहे ! ¤

# तेलंगणानंतर विदर्भही भडकेल काय ?

लं. त्र्यं. जोशी

गेले दोन महिने वेगळ्या तेलंगण राज्याचा प्रश्न सर्व वृत्तपत्रांतून गाजत आहे. जसतसे हे आंदोलन तीव्र होऊ लागले तसतसे त्या तापलेल्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील जनता व केंद्र सरकार यांच्यासमोर काही प्रश्न प्रकर्षाने उभे राहू लागले. त्यांतील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जर वेगळे तेलंगण राज्य निर्माण केले तर पुढे वेगळ्या विदर्भाची मागणी जोर धरील काय ? महाराष्ट्र विधिमंडळातही या प्रश्नाचे पडसाद उमटले आणि उपेक्षित भागांच्या विकासासाठी प्रयत्न झाले नाहीत तर तेलंगण धर्तीची चळवळ सुरू करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. स्वतंत्र विदर्भाची चळवळ फोफावण्याची शक्यता एकाच आधारावर व्यक्त केली जाते आणि तो म्हणजे गतवर्षी झालेले कृषिविद्यापीठ आंदोलन. परंतु हा आधार तोकडा आहे असे वाटते. आजचे राजकारण अंकगणितातील बेरीज-वजाबाकीइतके सोपे राहिलेले नाही. अनेक प्रकारचे प्रभावी गट राजकारणात सक्रीय असतात. वास्तविक तेलंगणातील जनतेच्या व्यथा नव्या नाहीत आणि तेलंगणातील सातसात मंत्री आंध्र राज्याच्या मंत्रिमंडळात असताना त्या कशा शिल्लक राहिल्या, आणि आताच त्यांनी कशी उचल खाल्ली, हाही विचाराचा प्रश्न आहे. कृषिविद्यापीठ आंदोलनाची पार्श्वभूमी तेलंगण चळवळीपेक्षा भिन्न होती. तेलंगणातील जनतेच्या समस्या सोडविण्याचा एकमेव रामबाण उपाय म्हणणे वेगळे राज्य ही तेथील

[ पृष्ठ ६० वर ]

## गेल्या अंकावरील

माणूस : १२ जुलै १९६९ : मुखपृष्ठ

# जाहीरात लिहिण्यापूर्वी....

देवीदास बागूल

माणूस साप्ताहिक गेली सात वर्षे संगम प्रेसमध्ये छापले जात होते. आता माणूसने स्वतःचा प्रेस सुरू केला आणि माणूसची छपाई स्वतःच्या प्रेसमध्ये सुरू करण्याचे ठरले. संगममध्ये त्याचे शेवटचे चारपाच अंक राहिले होते. अशा वेळी संगमच्या पटवर्धनांनी सांगितले की संगममध्ये छापण्यात येणाऱ्या शेवटच्या माणूस अंकात संगमची शुभेच्छा जाहीरात द्यायला हवी.

सर्वसाधारण रीतीरिवाज म्हणून हे योग्यच होते. मनात आले की ही जाहिरात नेहमीच्या शुभेच्छादर्शक पद्धतीची असावी. आपण तसा मजकूर आणि आकर्षक रचना करून देऊ. आणि मनातला हा विचार पटवर्धनांना सांगितला. पण त्यांच्या मनात वेगळाच विचार होता. ते म्हणाले की तशी नेहमीच्या पद्धतीची जाहीरात देण्यात आमच्या दोघांच्या संबंधांना एकप्रकारे कोरडेपणाने हाताळल्यासारखे होईल. ही जाहिरात देण्याचा हेतू संगमची प्रतिमा माणूसच्या वाचकांपुढे उभी करण्याचा नाही किंवा त्या निमित्ताने माणूसला आर्थिक मदत करण्याचा नाही. ह्या जाहीरातीतून संगम प्रेस आणि माणूस साप्ताहिक यांचे परस्परांमधील जे नाते तयार झाले होते त्याचे दर्शन झाले पाहिजे. गेल्या सात वर्षातील त्यांचे आणि आमचे वागणे, बोलणे लक्षात घेऊन ही जाहीरात केली पाहिजे.

मी गेल्या सात वर्षातील माझ्या डोळ्यासमोर घडलेले प्रसंग आठवू लागलो.

माणूसचे मुखपृष्ठ कसे असावे ही गोष्ट माधवराव पटवर्धन आणि माजगावकर यांच्या भेटीचे मुख्य आणि ठराविक कारण. माजगावकरांनी आठवड्याचा विषय व कल्पना माधवरावांना सांगायची, दोघांनी उठून सालकरांकडे जायचे, सालकरांनी

चित्र तयार केल्यावर परत माधरावांनी मुखपृष्ठाचे रंग ठरवायचे, माजगावकरांनी त्यात ढवळाढवळ करायची, माधवरावांनी आपल्या निवडीची हमी द्यायची, प्रेस-मधून रंगांचे डबे मागवून दोनचार शाया तयार करून पाह्यच्या— अशा अनेक झटापटी होऊन माणूसचे मुखपृष्ठ तयार व्हायचे. अशा वेळी माजगावकर शेवटी वाचकांच्या भूमिकेतून उत्सुकतेने बघत राहत आणि माधवराव संपादकाची भूमिका जगत.

वास्तविक गिऱ्हाईकाने दिलेले मुखपृष्ठ उत्तम छापून देणे हे छापखानेवाल्याचे काम. ते काम तर करणारच पण आपल्या गिऱ्हाईकाच्या प्रयोगशील कार्यात आपल्या रसिकतेचा हातभारही लावणार, ही तळमळ पटवर्धनांकडे असल्याने ते गिऱ्हाईकांचे मित्रच बनतात. आणि मग त्या कामाचा उत्सव बनत असे. त्या उत्सवात छापखान्यातील सगळ्यांनाच — कंपॉझिटर, फोरमन, प्रेसमन, सुपरवायझर — भाग घ्यावा लागे. भाग घ्यावा लागल्यावर प्रत्येकालाच त्या उत्सवाचे दर्शन होई आणि प्रत्येकजण झडझडून काम करीत असे. पुढे पुढे तर असे होऊ लागले की प्रेसमनसुद्धा मुखपृष्ठांचा रंग असा असावा, रचना अशी पाहिजे असे बिनसंकोच सुचवू लागला.

एक प्रसंग तर खूपच वेगळा आहे. दिवाळी अंकाची गोष्ट. प्रती जास्त काढायचे ठरले पण वेळ थोडा होता. रोटरी मशीनचे साह्य घेतले तरच वेळ निभावणार होती. कंपोज संगमचा पण छपाई दुसरीकडे. पटवर्धनांनी ह्याही योजनेला उचलून धरले आणि कंबर कसून ही योजना यशस्वी करण्यासाठी धावपळ सुरू केली. "कंपोज तुमच्या ताब्यात देतो तुम्ही छापून घ्या" असे म्हणून पटवर्धनांना इतर कामासाठी मोकळे होता आले असते. पण माणूसच्या बाबतीत पटवर्धनांना मोकळे व्हावेसे वाटत नव्हते आणि माजगावकरांनाही पटवर्धनांनी मोकळे व्हावे असे वाटत नव्हते. म्हणून हा अंक केसरीमध्ये सुरळीत छापून होईपर्यंत दोघे मिळून धावपळ करीत होते. ज्या दिवशी केसरी मुद्रणालयात माणूस दिवाळी अंक छपाईला सुरू होणार होता त्या दिवशी पटवर्धनबंधू जातीने हजर राहिले. मला ही घटना फार उत्साहदायक वाटते. एखाद्या मुद्रकाने स्वतःच्या धंद्यापुरते न बघता एकंदर व्यवसायाच्या वाढीच्या दृष्टीने पाहून सहकार्याने वागण्यात आनंद मानणे ही गोष्ट सर्वार्थांनी समृद्धकारक आहे असे मला वाटते. वास्तविक रोटरीखाली आपला दहावीस फॉर्म्सचा टाईप मार खाऊन निरुपयोगी होणार. त्याची पै करावी लागणार, हा व्यापारी हिशोब ध्यानी घेऊन कोणाही मुद्रकाने या व्यवस्थेला नकारच दिला असता. पण पटवर्धनांची दृष्टी इतकी प्रागतिक की त्या छपाईप्रसंगी त्यांनी उलट केसरी मुद्रणालयाच्या मोठेपणाची प्रशंसा केली. गिऱ्हाईकाचा आणि छापखानेवाल्याच्या गाठीभेटीत बिलाच्या, छापून केव्हा देता याच्या, मुद्रणदोषांच्या, वाईट छपाईच्या गोष्टी निघतात. पुढचे काम तरी चांगले व्हावे म्हणून थोडीबहुत चालू कामाची स्तुती करावयाची ! परंतु माजगावकर—पटवर्धन यांच्या गाठीभेटीत


माणूसचे स्वरूप आणि अंतरंग अधिक विविध आणि गुणपूर्ण कसे होईल याच्या तासनतास चर्चा चालत. एकदा तर पमासाहेब आजारी आहेत म्हणून माजगावकर भेटायला गेले. थोडीबहुत प्रकृतीची चौकशी होते न होते तोच पमासाहेबांनी एका कुमार वयाच्या मुलाने परदेशाहून पाठवलेल्या पत्रांची प्रशंसा केली. हा पत्रव्यवहार माणूसमधून प्रसिद्ध झाल्यास आपल्या संस्कृतीच्या आणि पाश्चात्य संस्कृतीच्या काही खेळकर शलाका आपल्या वाचकांना बघावयास मिळतील असेही पमासाहेबांनी सांगितले. माजगावकरांनी उत्सुकता दाखवताच पमासाहेबांनी फोन करून तो पत्रव्यवहार आणि कुमार लेखक यांना बोलावून घेतले. आणि या संयुक्त मुलाखतीतून पुढच्या दिवाळी अंकात ' राजूचा पत्रव्यवहार ' प्रसिद्ध झाला आणि गाजलाही.

संपादक–मुद्रक यांनी स्नेहभावनेने एखादे नियतकालिक छापले म्हणजे वियोगाच्या वेळी आर्थिक व्यवहाराची जाणीव खुपण्याऐवजी प्रेमभावनेची तीव्रता कशी उत्कटतेने जाणवते याचे रसरशीत प्रत्यंतर माणूस तर्फे 'संगम'च्या सहकाऱ्यांना अल्पोपहार दिला त्यावेळी दिसले. प्रास्ताविक भाषणात माजगावकरांनी अतिशय प्रांजळपणे सांगितले की माणूसच्या आजच्या रंगरूपात संगमचा खूपच वाटा आहे. इतकेच नव्हे तर आमचा प्रेस उभा करण्याचे ठरले तेव्हा घुसमटून घेऊन, तुटकपणे न वागता तज्ज्ञ आणि हितकारक सल्लाही त्यांनी दिला. आणि म्हणूनच उद्या जेव्हा अडचण येईल तेव्हा पुन्हा संगमकडे धाव घेण्यात अनमान न वाटता आनंदच वाटेल.


पमासाहेबांच्या भाषणातही हीच स्नेहाची भावना उत्कट होती. ते म्हणाले की, इतर अनेकजण नियतकालिके छापून घेण्यास येतात; पण माजगावकरांच्या ठिकाणी समाजहिताची जी कळकळ आहे, ध्येयनिष्ठेबद्दल जी अविचल धैर्यवृत्ति आहे त्यामुळे मला ह्या कृतज्ञ स्मृतीबद्दल पुन्हा आशा वाटू लागली आहे. स्वतःच्या उदरभरणाशी सामाजिक हिताची सांगड घालण्यातील माणूसची दृष्टी फार फार दुर्मिळ आहे. माणूसच्या निमित्ताने आमच्या प्रेसमध्ये ज्या चर्चा होत त्या मला नेहमीच आठवतील. माणूस गेल्यामुळे आमचा फार मोठा धंदा गेला ही गोष्ट जरी खरी असली तरी त्या दुःखद जाणीवेवर संपादकीय स्नेहाने मात केली हे कबूल करण्यात मला आनंद वाटतो.

व्यावसायिक स्पर्धा, धंद्यांतील हानि या गोष्टींना प्रसन्नपणे सामोरे जाऊन एकमेकांना आपुलकीने आणि भविष्यकाळात सहकार्याचे आश्वासन देऊन दोघांनी निरोप घेण्यातील समृद्धपणा मला फार स्पृहणीय वाटला. ह्या समृद्धपणामुळेच अल्पोपहार झाल्यावर पटवर्धनांनी आणि संगमच्या कामगारांनी माणूसच्या नव्या छापखान्यातील लहानमोठी यंत्रे मोठ्या कौतुकाने पाहिली. आणि ते कौतुकाने पाहत आहेत याचा माजगावकरांना फार फार आनंद वाटला.

◻ ◻







## शनिवार दिनांक ५ जुलै, संध्याकाळ....

पमासाहेबांचं याप्रसंगीचं भाषण अगदी उत्स्फूर्त होतं. भाषणाऐवजी संभाषणच त्याला म्हणावं इतकं. त्यांत खंत होती, पण जोमदार आशावादही होता.
शेजारी, संगमचे नवे, छोटे मालक सुजित पटवर्धन.

माणूस कार्यालयात संगम परिवारासाठी योजलेल्या निरोप समारंभप्रसंगी...
रावसाहेब पटवर्धन, सौ. सुनंदाताई पटवर्धन, श्री. आपटे.

पमासाहेब व श्री. ग. मा.

एक चेहरा मात्र येथे अभावानेच तळपला. माधवराव! त्यांचे म्हणा नेहमीच असे.. सगळे जमवून द्यायचे आणि ऐनवेळी हटकून पसार......



... हे आता सगळे शांत बसले आहेत, शिस्तीने ओळीत उभे आहेत हे खरे ! पण माधवरावांनी प्रेसमध्ये पाऊल ठेवले की सगळयांची जी तारांबळ उडे ती पाहण्यासारखी असे. कुणाला ते कुठे पिटाळतील, कसा घोटाळत – तिष्ठत ठेवतील याचा काही नेमच नाही ! पण सगळे निमूटपणे ऐकून घेत, चिडत चडपडत का होईना त्यांनी चालवलेले हाल पत्करीत याचे कारण एकच – ऐन मध्यरात्रीसुद्धा वेळ पडली तर हा मालक त्यांच्या अडीअडचणीला उभा राही. कुणाला हॉस्पिटलमध्ये



दाखल करायचे आहे, कुणाला पोलिसांच्या कचाटयातू सोडवून आणायचे आहे, कुणाच्या मुलाल -नातेवाईकाल कुठे चिटकवून द्यायचे आहे- निघाल माधवरा गाडी घेऊन !

म्हणूनच 'संगम'मधील कामाला 'उत्सवाच स्वरू येई' असे येणाऱ्या जाणाऱ्याला देखील भासत असे.


या उत्सवाचे काही प्रमुख मानकरी – [ पृ ठ १२ ]
डावीकडून अनुक्रमे –

आडकर (उपप्रमुख, छपाई विभाग)
सातपुते (जुळणी विभाग प्रमुख)
डहाळे (बांधणी विभाग प्रमुख)
शिवगुरु (छपाई विभाग प्रमुख)
पुंडे (पळापळ, धावपळ !)
रामभाऊ (स्टोअर्स)
माळवदे (उपप्रमुख, छपाई विभाग)

सानम – 'मुखपृष्ठाचा रंग कसा असावा, रचना अशी पाहिजे असे बिनसंकोच सुचविणारा प्रेसमन !









......

या वातावरणात वाढलेले, रंगलेले हे 'संगम'चेच श्री. पाध्ये. 'माणूस'बरोबर हेही नव्या जागेत आले.

'माणूस' यापुढे जिथे छापला जाणार त्या 'साप्ताहिक मुद्रण'चा श्रीगणेशा करून बहुत काळ उलटला. पण 'नमः सिद्धं' काही होईना. घेतलेले मशीन एक दिवस चालू आणि आठ दिवस बंद! नारळ किती फुटले असतील कुणास ठाऊक! पण मेकॅनिकही जिद्दीचा माणूस. दिवसरात्र झटापटी करून त्यांनी शेवटी ते सुरळीत चालू करून दाखविले.

मेकॅनिक नामदेवराव जाधव.

'साप्ताहिक मुद्रण'चे तरुण व्यवस्थापक संजीव देशपांडे

प्रेसमन खैरे, शितप, ही मंडळी म्हणताहेत — 'आता काळजी नाही.' पमासाहेब — शिवगुरु वगैरेंसारख्या जाणत्यांनाही असे वाटत आहे.

पण हातच्या काकणाला आरसा हवा कशाला? पुढचा अंक कसा काय निघतो ते दिसेलच!

□

# मुक्ताफळे



## कामतांची कावकाव

प्रजासमाजवादी पक्ष सध्या ‘ दिगंबर ’ अवस्थेत आहे. ‘ तीन शिरे, कर सहा शोभती ’ असे त्याचे नेटके रूप. नाथ पै, एच्. व्ही. कामत आणि ना. ग. गोरे हे तीन अ. भा. पुढारीच काय ते समाजवादी प्रजेला शोधीत कधी कधी इकडे तिकडे दौरे करताना दिसतात. भारताच्या राष्ट्रपतिपदासाठी खरे पाहता वराहगिरी वेंकटगिरींना त्यांनी पाठिंबा द्यायचा कारण गिरी हे पूर्वीचे ट्रेड युनियनिस्ट. आज ‘ श्रम छावणीत ’ नसले तरी मूळ श्रमिकांच्या छावणीतले. परंतू काही कारणाने गिरी यांना प्र. स. पक्षाचा पाठींबा नाही. आम्ही म्हणतो पाठिंबा नाही तर नाही, पण श्री. गिरी हे निवडून आले तरी राष्ट्रपती होण्यास लायक नाहीत असा प्रचार का करता ?

एच्. व्ही. कामत यांनी नुकतेच एक पत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यांत ते म्हणतात——

“ भारताचा राष्ट्रपति हा साध्या राहणीचा, उच्च विचारसरणीचा असा तत्त्वज्ञानी राज्यकर्ता असावा. त्याचा खाजगी खर्च व लवाजमा कमीतकमी असावा. राष्ट्रपतींच्या कुटुंबातील मंडळी नेहमी राष्ट्रपतीभवनांतच रहाणार असल्याने त्यांचे कुटुंबही नियोजित असावे. ”

कामत मोठे हुषार गृहस्थ दिसतात. गिरी यांना चौदा मुले आहेत, ही गोष्ट माहित असल्यामुळेच त्यांनी हा गिरी भोवती नवा ‘ लूप ’ टाकलेला आहे. गिरी यांची राहणी ‘ साधी ’ नाही व विचारसरणी ही ‘ उच्च ’ नसून ‘ गच्च ’ आहे असे कामतांचे म्हणणे दिसते.

आमचे म्हणणे बापामुळे कधी कधी मुले फुकट जातात, परंतु मुलांमुळे बाप फुकट गेल्याचे उदाहरण आतापर्यंत नाही. संजीव रेड्डींचे ग्रहण सुटून जर इंदिरा-

जींना गिरींचे दान पडलेच तर केवळ ते जास्तच कुटुंबवत्सल आहेत म्हणून त्यांना राष्ट्रपतिपद नाकारणे हा अन्याय होय !

दोन किंवा तीनच पुढारी पुरेत, तीन किंवा चारच अनुयायी पुरेत, असे कामतांच्या पक्षाला वाटत असल्यास त्यांनी खुशाल आपला पक्ष चालू ठेवावा. उगाच उलटपक्षी कावकाव करू नये.

## युद्धमंडपातील नारायण !

इस्रायलचे काय करायचे हा जगातला बडया बडया चार राष्ट्रांपुढे मोठाच प्रश्न झालेला आहे. जून ६७ मध्ये इस्रायलने नासरला जे तडाखे दिले ते दुरून गमतीने पाहताना कोसिजीनदेखील कळवळून म्हणाला– " केवढे क्रौर्य हे ! परंतु 'क्षणोक्षणी पडे, उठे परि बळें ' या अवस्थेतील नासर आतां पुनः डरकाळू लागला आहे ! दोन महिन्यांपूर्वी कैरोला इजिप्तच्या नॅशनल काँग्रेसपुढे बोलताना नासर म्हणाला—

" मार खाल्ल्यानंतर ताबडतोब पुनः युद्ध करणे आपल्याला शक्यच नव्हते. परंतु पुनः आता आपली मजबूत तयारी झालेली आहे. इतके दिवस सरहद्दीवरच्या आपल्या अरब सैनिकांनी शत्रूवर गोळी चालवली तर आम्ही त्याला दबवीत होतो, आवरत होतो. आता चित्र पालटले आहे ! आता आमच्या सैनिकांनी गोळया चालवल्या नाहीत तर आम्ही त्यांना जाब विचारतो ! "

अध्यक्ष नासरचा हा युद्धावतार पाहताच नॅशनल काँग्रेसच्या १७०० प्रतिनिधींनी टाळयांचा कडकडाट केला. टाळया वाजवणारे व प्रत्यक्ष लढणारे हात निराळे असले की असा कडकडाट होऊ शकतो. भारावून गेलेल्या नासरने मग कुराणातले वचन सांगितले– " लढाई करणे या गोष्टीचा तुम्हाला तिटकारा आहे, परंतु अल्लाच्या इच्छेप्रमाणे तुम्हाला लढले हे पाहिजेच ! "

इकडे नासर लोकप्रतिनिधींना अल्लाची इच्छा सांगत होता, तेव्हा तिकडे संयुक्त राष्ट्रांत बडया चार राष्ट्रांचे प्रतिनिधी जमून काही उपयोग नाही, असा इस्रायलच्या प्रतिनिधीचा गिल्ला सुरू झाला होता. इस्रायलचे म्हणणे, नासरला काय बोलायचे ते त्याने आमच्याशी बोलावे ! चार बडयांनी अरब–इस्रायल समझोता व्हावा यासाठी डॉ. गुन्नार जारिंगचे शिगरु कैरोला रवाना केले होते. पावणेदोन वर्षे कैरो – तेल ऑव्हिव्ह – वॉशिंग्टन – बैरुत – लंडन – पॅरीस अशा हेलपाटयावारी हे शिगरु बेजार झाले. डॉ. जारींगने राजिनामा देताना सांगून टाकले – " इस्रायलच्या प्रतिनिधीशी समक्ष बोलणी करण्यास नासर नकार देत आहे. माझी शिष्टाई फुकट गेली याला मुख्य कारण नासरचा अडेलतट्टुपणा होय ! "

डॉ. जारींगने नासरला दोषी ठरवला व बाळ नासर तर तिकडे 'दही घाल हातावरती' या पवित्र्यांत ! हे पाहून खरे पाहता इस्रायलची 'पाचावर धारण' बसायला हवी. तुम्ही म्हणाल हे पाच कोण ? तर बडे चार आणि इजिप्त मिळून पाच नाही का ? तर अशी 'पाचावर' धारण बसली ती इस्रायलची नाही... हादरला तो जॉर्डनचा राजा हुसेन. जून ६७ च्या युद्धात इजिप्तने घालवले ते सिनायचे वाळवंट ! परंतु जॉर्डनच्या राजाने जेरुसलेम शहरच घालवले. हुसेनला दोन वर्षापूर्वीचे सगळे आठवले आणि त्याने लगेच वॉशिंग्टनचा रस्ता धरला.

वॉशिंग्टनला जाऊन राजे हुसेन यांनी पश्चिम आशियातील पेच आणि प्रसंग दोन्ही टाळण्यासाठी सहा कलमी शांतता योजना जाहीर केली. ज्या कारणाने युद्ध सुरू झाले ते लक्षात घेऊन राजे हुसेनने जाहीर केले–

"अकाबाच्या आखातातून इस्रायली जहाजाना आम्ही जाऊ देऊच, शिवाय सुवेजच्या कालव्यातूनही त्यांना जा–ये करता येईल !"

आणि याच्या बदल्यात – "इस्रायलने १९६७ च्या युद्धापूर्वीच्या सरहद्दीपर्यंत मागे जावे. सिनाय खाली करावे. जेरुसलेम आमच्या स्वाधीन करावे."

खरे पाहता ही योजना किती सुंदर आहे ! परंतु दुष्ट इस्रायलने या योजनेचे स्वागत तर केले नाहीच. उलट इस्रायलचे परराष्ट्रमंत्री श्री. अबा ईबन यांनी नासरच्या नाकात काडी घातली–'जून ६७ मध्ये युद्ध करून पाहिल्यानंतर आता जर अरबांना शांततेचे डोहाळे लागले असतील, तर त्यांनी वाटाघाटीसाठी आमच्यासमोर टेबलावर बसले पाहिजे. आणि अटी कुणी कुणाला घालायच्या ? अरबांनी आम्हाला ? ते शक्य नाही. १९६७ पूर्वीच्या सीमारेषा स्वीकारण्याचा तर आता आमचा मुळीच इरादा नाही. ज्या घातक सरहद्दींमुळे युद्धाचा प्रसंग आमच्यावर तीन वेळा आला, त्या सरहद्दी पत्करून शांतता कशी टिकेल ?

याचा अर्थ आपला पराभव झाला आहे हे लक्षात ठेऊन अरबांनी व्यवहार करावा असा होतो ! इस्रायलने नासरचा असा पाणउतारा करावा हे आम्हाला मुळीच आवडलेले नाही. इस्रायलमध्ये जयप्रकाश नारायणांसारखे नेते नाहीत हे त्यांचे दुर्दैव होय. अरब राष्ट्रकुलाने आपल्या भारतातील वकिलातीमार्फत 'पॅलेस्टाईन–काही दृष्टीकोन' या नांवाचे जे पुस्तक, नुकतेच प्रसिद्ध केले आहे, त्यात जयप्रकाश नारायण यांनी पॅलेस्टाईनच्या प्रश्नावर लिहिताना म्हटले आहे–

"इस्रायली जनतेला हे कळत नाही की, अरबांचा मुलुख ताब्यांत ठेवल्याने काही त्यांना हवी असलेली सुरक्षितता लाभणार नाही. पॅलेस्टाईन अरब व इस्रायली यांचे संयुक्त राष्ट्रीयत्वाचे राष्ट्र निर्माण केल्यानेच हा प्रश्न सुटेल. पॅलेस्टाईन अरब व आसपासची अरब राष्ट्रे यांची मैत्री व सदिच्छा यावरच इस्रायलची सुरक्षितता अवलंबून आहे."

पॅलेस्टाईनमध्ये अरब व इस्रायली यांची दोन राष्ट्रे पूर्वी एकत्र होती. या उभय

राष्ट्रवादाची रूपे संपूर्णपणे परस्परविरोधी असल्याने, पॅलेस्टाईनची फाळणी करण्यात आली. याचा अर्थ सर्व पॅलेस्टाईन अरबांचे आहे हे नाकारून, अरबांच्या काही भूमीवर इस्रायलने कबजा केला. यामुळे इस्रायलला सुरक्षितता लाभली नाही असे नारायणमहाराजांना वाटते व ते सांगतात–" फाळणी रद्द केल्याखेरीज इस्रायलला सुरक्षितता लाभणार नाही...अरबांच्या सदिच्छा हीच खरी सुरक्षितता! "

आता याच महाराजांवर पूर्वी असाच एक गंभीर प्रसंग आलेला होता, तेव्हा ते कसे वागले? भारताची फाळणी पत्करण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणी बसली, तेव्हा खास निमंत्रित म्हणून दोनच समाजवादी हजर होते. एक डॉ. राममनोहर लोहिया आणि दुसरे जयप्रकाश नारायण! तेव्हां नारायणमहाराज असे नाही म्हणाले–" छे छे फाळणी मी होऊ देणार नाही. भारतातील हिंदूच्या सदिच्छा व मैत्री यावरच मुसलमानांची सुरक्षितता अवलंबून आहे. हिंदूंचा काही मुलुख ताब्यांत घेतल्याने काही त्यांना ही सुरक्षितता लाभणार नाही. " डॉ. राममनोहर लोहियांनी लिहिले आहे––

" जयप्रकाश नारायण यांनी थोडक्यात पण निश्चयात्मक विरोध केला. ते एकदाच बोलले. नंतर शेवटपर्यंत चूप होते. ते असे कां वागले? गप्प बसण्यातच शहाणपण आहे असे त्यांना वाटले? "

[ – भारतीय फाळणीचे गुन्हेगार, पृष्ठ २६. ]

नारायणमहाराजांना असे अडवणे मात्र बरे नाही हो! अरब म्हणून अरबांनी काय करावे, इस्रायली लोकांनी आपल्या सुरक्षितेसाठी काय करावे हे सर्व महाराजांना ठाऊक असले तरी हिंदू म्हणून आपण काय करायचे असा जातीय विचार त्यांच्यामनाला कधीही शिवलेला नाही. फाळणी होऊ देणार नाही, या अट्टाहासाने गांधीजींपेक्षा शतपटीने कनिष्ठ असलेला कांगोचा पॅट्रिस लुमुम्बाने मरण पत्करले. जयप्रकाशांनी त्यावेळी असे काही मनांत आणले असते तर, भारतातील समाजवादी चळवळीची, सर्वोदयाची, आणि शेख अब्दुल्लांची किती हानी झाली असती, नाही का?

इस्रायलच्या जन्मापासून त्याच्या अस्तित्वावर उठलेल्या नासरला आणि जॉर्डनच्या राजाला जाहीरपणे चार शब्द ऐकवल्याचे श्रेष्ठ धारिष्टय प्रगट करणे आज सोयीचे नाही. सोईप्रमाणे चूप बसावे, बोलायचेच झाले तर 'इतिहास' न पाहता वाटोळे वाटोळे बोलावे, म्हणजे अखंड नेतेपण प्राप्त होते, असा इथला अनुभव आहे.

– ग्यानबा

# स ली ल

## ले खां क । चा र

## चं द्र शे ख र

महाराष्ट्र निवास. सकाळचे पाच वाजले आहेत. निवासात एवढ्या लौकर चहा मिळत नाही. मी अस्वस्थपणे चहा न घेताच सिगारेट शिलगावतो आणि बाल्कनीत येतो. माझ्या गैरसोयीमुळे मी अतिशय बेचैन आहे. उठल्यावरोबर चहा मिळणे हा प्रत्येक मानवाचा मूलभूत हक्क आहे व तो प्रस्थापित करण्यासाठी काय करता येईल याचा मी विचार करीत आहे. चहाचा एक कप हे माझ्या सर्व विचार-शक्तीचे केंद्र झाले आहे.

मी बाल्कनीतून खोलीत येतो आणि एका कलत्या खुर्चीत अस्वस्थपणे अंग झोकून देतो.

अनोळखी पहाटेच्या त्या नीरवतेमध्ये एक आवाज मधूनमधून वर उठत आहे. टण-टण हा तो क्षीण आवाज. इतका क्षीण, पण इतका क्षमाशील, इतका मधुर पण इतका मोडलेला !

हा आवाज मला पुढे आठ दिवस सतत ऐकू येणार होता. नीरवतेमध्ये आणि नक्षलवादी घोषणांच्या गदारोळातदेखील — निर्जन रस्त्यावर आणि डलहौसीच्या गजबजलेल्या हमरस्त्यावर ! कलकत्ता सोडेपर्यंत मला या आवाजाची सोबत होणार होती.

आवाजाची सोबत ! सहा वाजता स्वस्थ बसणे अशक्य होऊन मी धाडधाड खाली येतो आणि निवासाच्याबाहेर पडतो. हातरिक्शावाले ओळीने रस्त्यावर उभे आहेत. त्यांच्यापैकी एकाला हात करतो.

रिक्शात आम्ही विराजमान होतो. जेमतेम नव्वद पौंड वजनाचा तो फाटका माणूस ईर्षेने रिक्शा ओढू लागतो. टण-टण या ध्वनीचे गूढ मला तेव्हा उलगडते. रिक्शावाल्याच्या हाताला एक छोटे घुंगरू बांधलेले असते. गर्दीतून वाट काढण्यासाठी तो ते रिक्शाच्या दांड्यावर आपटतो. 'टण टण-टण टण !'

वाटेत एका पंजाबी ढाब्यात मी चहा ढोसतो. रिक्शावाल्यालाही देतो. रिक्शा पुढे चालू लागते. चहा पोटात गेल्याने फार बरे वाटते. असेही वाटते की, माणूस माणसाला पुढे नेत आहे. तसा नाही तर निदान असा तरी !




एक-दोन फर्लांग गेल्यावर मला हे सारे असह्य होते. मी रिक्शा थांबवण्यास सांगतो. रिक्शावाल्याच्या नजरेत निराशा स्पष्ट दिसते.

" क्यों बाबू – घुमेंगे नहीं ?"

" देखो ! हजरा पार्कमें रिक्शा खडा करो."

आम्ही दोघे हजरा पार्कमध्ये एका बाकावर बसतो. मी सिगारेट पेटवतो. रिक्शावाल्याला एक देतो. त्याची माहिती विचारू लागतो. रिक्शावाला बिहारी. रोज दोन रुपये मालकाला द्यावे लागतात. मधून मधून पोलिसाला काही द्यावे लागते. सगळे जाऊन त्याला महिना साधारण शंभर रुपये उरतात. पावसाळ्यात धंदा जोरात होतो. दहा-वीस रिक्शावाले एकत्र राहतात – फूटपाथवर !

"आजारी वगैरे पडल्यावर काय करता ? " जणू मी उद्या एखादे मोफत इस्पितळ खोलणार आहे अशा आविर्भावात विचारतो.

रिक्शावाला आता कंटाळला आहे. तो चिकाटीने विचारतो, "– चलो, बाबू घुमेंगे ना ? कालीघाट दिखाता हूँ."

मी म्हणतो "चलो." रिक्शावाल्याला सुमारे अर्ध्या मैलाच्या रपेटीसाठी चार आणे मिळतात. रोज तीस ते पन्नास मैल रपेट होते. केवढी स्वस्ताई! विमनस्कपणे त्याच्या रिक्शातून मी थोडा फिरतो.

कालीघाटावर आल्यावर तो विचारतो, "–समशानघाट देखेंगे? जहाँ मुरदे जलाते हैं."

"नहीं. वापस चलो. जब जिंदे जलते हुए देखे तो अब मुरदे क्या देखना?"

रिक्शावाला मनात म्हणत असावा, बाबू मॅड असावा. फुकट टाईम खराब केला!

निवासापाशी आल्यावर मी त्याच्या हातात दोन रुपये टाकतो आणि एखाद्या अपराध्यासारखा चालू लागतो. मला चालता येते याचा आनंद मानीत. चहा तयार असतो.

माझ्या खोलीचा नोकर बिहारी. चटकू त्याचे नाव. लहानखुरा, कुरळ्या केसांचा, समजूतदार.

"क्या, तुम बंगला हो?"

"क्या बाबू बात करत है! बंगला क्या काम करेगा?" चटकूजवळ छक्केपंजे काही नाहीत.

चटकूला सुटी हा शब्द माहित नाही. ४५ रु. पगार. सकाळी साडेपाचला ड्यूटी सुरू–रात्रीपर्यंत. दुपारी गारगरम फरशीवर ताणून देत असेल तेवढीच विश्रांती! रात्री दारू खाऊन पडतो. बरे असते!

"मुलखात जातोस की नाही?"

"हां! जबके अकाल होवे–दो साल पहले तो गया था!"

आपल्या मुलखाची भेट केवळ दुष्काळातच! बायको अर्थातच नाही. कोणी जातवाला गावी असायचा. त्याच्याकडे चारदोन दिवस राहायचे.

'हमरा देस बहोत अच्छा है. ये बंगला बिलकूल खराब' चटकू हात नाचवीत सांगतो.

'तो फिर यहाँ क्यू आया बे?'

"का करेगा. ये कंबक्त पेट जो है।"

माझ्या कॉटखालच्या बियरच्या बाटल्यांकडे पाहत चटकू असहाय्यता व्यक्त करतो आणि चोरट्या आवाजात विचारतो,

"आज रातभी दारू लावेगा बाबू?"

मी हसतो आणि म्हणतो "नहीं! ये तो दोस्तानेका मामला रहता है चटकू. शायद कोई मिले तो बोल नहीं सकता."

टेबलावरच्या पाकिटातून पाच रुपये काढून त्याच्या हातात देतो आणि उदारपणे मी त्याला सांगतो—

"तुम तुम्हारा रंग जमाते जावो."

" आपकी नामसे आज रात बडा मझा आयेगा."

त्याला त्या रात्री बडा मझा आला की नाही ते कळले नाही. कारण, तो नेहमीच मजेत दिसायचा.

नेताजी सुभाष रोड. दुपारचे दोन वाजले आहेत. संघाचे एक कार्यकर्ते मला त्यांच्या स्कूटरवरून त्यांच्या कचेरीत घेऊन चालले आहेत. माझ्याशी बोलताना ते गफलत करतात. 'नो एन्ट्री' रस्त्यातून वाहन घालतात.

कोठूनतरी एक अजस्र पोलीस टपकतो. जगातील सर्व करुणा चेहऱ्यावर एकत्र करीत तो संघवाल्यांना रिंगणात घेतो.

" क्यों बाबू–कानून आपनेहि बनाये है ना ?"

संघवाल्यांना घाम फुटतो. मला तर सकाळपासूनच घामाने बेजार केले आहे. त्यामुळे माझे पितळ उघडे पडत नाही. नेहमीची अजीजी, गुरकावणी, निरिच्छता, तुच्छता वगैरे सर्व भावभावनांची उधळण होते.

हवालदार एकदम विचारात पडतो — " बाबू, हमें ऐसा लगता है की ये स्कूटरभी आपने चुराया है."

बाप रे ! संघवाले आणखीनच कोसळतात. त्यांच्याजवळ ड्रायव्हिंग लायसेन्स् नाही. रजिस्ट्रेशन बुक नाही. ते नुसतेच हसत राहतात. वीस वर्षे कलकत्त्यात राहूनही पोलिसासमोर हसावयाचे नसते हे त्यांना ठाऊक नसावे हे विशेष !

प्रकरण फार चिघळते असे पाहून मी मध्ये पडतो. पुण्याहून आलो, पत्रकार आहे, कलकत्त्याचा पाहुणा आहे वगैरे. असहाय्यता माणसाला किती मनमिळाऊ बनवते !

" देखो मराठाबाबू, आप शौकसे चले जाईये ! इनको तो हम ठाणा ले जाते हैं.'

" क्या ये इन्साफ है ?" बलराज सहानींसारखा आवाज काढीत आणि शम्मी कपूरसारखे हात उभारीत मी ओरडतो. " हम इन्हें छोडकर कैसे जाये ? क्या वो हमे शोभा देगा ?"

संघवाल्यांच्या डोक्यात हळूहळू प्रकाश पडतो. खिशांतून ते तीन रुपये काढतात. हवालदार प्राणांतिक दुःख झाल्यासारखा चेहरा करतो व आजूबाजूच्या लोकांकडे पाहत 'क्या साली दुनियादारी है' असा भाव व्यक्त करतो.

" तो आप हमे रिश्वत दे रहे हैं. हमारा इन्सल्ट करते हैं."

पुन्हा मी मध्ये पडतो " देखिये ये तो आजके लिये तोहफा समझिये. अगर ये मांजरा न होता तो हमें बंगालके पुलीसको मिलनेका मौका कैसे मिलता ?"

" ये भी सोचनेकी बात है." हवालदार समजूतदारपणे बोलतात. संघवाले अखेरीस पाच रुपये काढतात आणि आमच्या स्कूटरचा कान हवालदार सोडतात.

त्यांचा हळवा स्वभाव त्यांना गप्प बसू देत नाही. ते पुन्हा विचारतात, " ये

[ पृष्ठ ४८ वर ]

## उदास !

उगीच उदास
वाटतं आहे,
मनांत मळभ
दाटतं आहे !
वेडा वारा
धावतो आहे
माडाचा शेंडा
झुलतो आहे !
उगीचच वीज
झळकते आहे,
मुसळधार
बरसते आहे !
मनाला आज
भिजायचं नाही
—पण चिंब मी
भिजते आहे !
ओली आंसवं
ठिबकत आहेत,
अन् नभात
गडगडतं आहे !
चुकलं पांखरूं
वाट शोधतय्
पावसाच्या सरीत
अन् भिजतय्
मध्येच उगीच
वादळ येतय्
—न—कळत अन्
उदास वाटतय् !

अलका मुळगांवकर

## हत्तीचं अस्तित्व

उभा होता
सिग्नलाईज्ड कोपऱ्यावर,
कोणीतरी किंग
त्या कोपऱ्यावरच मेला
मृतात्म्यास शांती मिळो.
असाच पुलाखाली सरकलेला रस्ता...
फावडे ओढताना धपापला
चार मुंग्या चिरडल्या गेल्या
लाखदा थुंकला सारवणावर
खुबसुरतीचा मुलामा
खात्रीस काठी नसलेला
...उबविलेली अस्थींची वाहती हिमनदी.
जन्मजात खोकणं दमून जातं
जाणवतं ते हत्तीचं अस्तित्व
पडला आहे चिरगुटासारखा
सिग्नलाईज्ड कोपऱ्यावर
फटकून.
तेव्हापासून
मनाची भोळी काजळी
दिसते बुडता बुडता
अन आवढयांची होते पिठोरी पौर्णिमा.

मोहन सावंत

# आस्वाद :

अलका मुळगावकर यांची ' उदास ' ही कविता म्हणजे निसर्गाशी समतानता साधणाऱ्या उदास मनाचे रम्य चित्र आहे. मनातले मळभ आणि वातावरणातला धूसरपणा, ठिबकणारी ओली आसवे आणि नभातला गडगडाट वगैरे समांतर प्रतिमाने परिचित असली तरी सहजतेने आणि परिणामकारकपणे आलेली आहेत. धावणारा वेडा वारा नि झुलणारा माडाचा शेंडा, झळकणारी वीज नि बरसणारी मुसळधार यांच्या चित्रांकनाने बनलेल्या पार्श्वभूमीवर भिजायचे नाकारूनही चिंब भिजणारी, चुकल्या पाखरा गतअसहायपणे वाट शोधणारी अनुभूती उदासतेच्या अपेक्षित परिणामाकडे आपोआप वळते. वाचकाला आर्ततेची नकळत प्रतीती देते. कवितेला असलेल्या ओघवत्या रचनेमुळे ही प्रतीती मुलायमही होते.

मोहन सावंतांच्या ' हत्तीचं अस्तित्व ' या कवितेत अनेक जाणिवांचा एका अस्तित्वाच्या पातळीवर छेद गेला आहे. सिग्नलाइज्ड कोपऱ्यावर मेलेल्या किंगबद्दलची औपचारिक अनुकंपा आणि पुलाखालच्या रस्त्यावरून फावडे ओढताना चिरडल्या गेलेल्या चार मुंग्यांचे दुःख, मनाची भोळी काजळी नि आवंढ्यांची पिठोरी पौर्णिमा या परस्परविरुद्ध जोडणीला निष्ठुर वास्तवाचे अधिष्ठान आहे. खुबसुरतीच्या मुलाम्याची बेपर्वाई आणि अस्थींची हिमनदी उचंबळून झालेली जन्मजात खोकण्याची दमछाक यांच्या सोबतीने चिरगुटासारख्या पडलेल्या हत्तीचे अस्तित्व कवीला सर्व जाणिवेच्या केंद्रस्थानी वाटत आहे. हे अस्तित्व क्षुद्र आहे, तिरस्कृत आहे, बहिष्कृत आहे. पण अवाढव्य आहे. त्याच्याकडे दुर्लक्ष करताच येत नाही. ही कल्पना प्रभावी आहे. पण विक्षिप्त प्रतिमांची गुंफण कधीकधी दुर्बोधतेकडे वळते हे लक्षात ठेवले पाहिजे.

– रसिक

# जुगारी

## व. कृ. जोशी

'मी तुम्हाला आतापर्यंत सांगितलं नाही, पण आता सांगतो – तुमचा भाऊ अपघातात मेला नाही. त्याचा खून झाला.' 'खून? तो तर गाडीखाली...

इन्स्पेक्टर प्रधान आज मोठ्या खुशीत होते. हवालदार जाधवने टेबलावर ठेवलेल्या 'ताजी खबर' या दैनिकाच्या अंकातील मजकूर ते मोठ्या चवीने वाचत होते.

"कुप्रसिद्ध जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा."

"काल रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास इन्स्पे. प्रधान व त्यांचे सहकारी यांनी काझीपुऱ्यातील अनेक दिवस चालू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड घातली. जुगारी लोकांनी पोलीस येताच विजेचे दिवे बंद करून अंधार केला व पलायन करण्याचा प्रयत्न केला; परंतु तो यशस्वी झाला नाही. पोलिसांनी बारा जुगारी पकडले. त्यांत नगरशेट म्हणून मानले जाणारे मोतीलाल शहा व इतर प्रतिष्ठित सधन नागरीक आहेत......."

वाचता वाचता इन्स्पे. प्रधानांनी जवळच उभ्या असलेल्या जाधवकडे पाहिले व म्हणाले, "पण जाधव, त्यातला एक मात्र दिवे विझवताच निसटला व पळाला." जाधव म्हणाला, "खरोखर साहेब, आपण सगळ्या बाजूंनी कोंडी केली होती. कसा निसटला भगवान जाणे! तरी त्याने जेव्हा कंपाऊंडच्या भिंतीवरून उडी घेतली, तेव्हा दोन शिपाई मी त्याच्यामागे पाठविले. पळता पळता त्याने रेल्वे गेट गाठले अन् रुळांवरून तो पळू लागला. पण तेवढ्यात मेलगाडी धाड्धाड् करीत आली. मग आपल्या लोकांना पुढे जाताच येईना......"

"जाऊदे झालं जाधव." इन्स्पे. प्रधान म्हणाले. "मिळाली ती शिकार चांगलीच मोठी आहे. हा मोतीलाल अट्टल जुगारी म्हणून आज अनेक वर्षे साऱ्यांना माहीत आहे, पण बेटा आजपर्यंत कधी पोलिसांच्या हाती सापडला नव्हता."

मोतीलाल शहा हा जुगारी जगातला राजा मानला जाई. शहरातील सर्व मोठे जुगारी अड्डे त्याच्या मालकीचे आहेत हे पोलिसांना ठाऊक असूनही त्याला प्रत्यक्ष जुगार खेळताना पकडण्यात आजवर कुणालाही यश आले नव्हते. त्यामुळेच इन्स्पे. प्रधानांचे जनतेला, तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कौतुक वाटत होते.

इन्स्पे. प्रधान त्या जुगारी छाप्याबाबत कागदपत्र तयार करीत होते तोच त्यांच्या



टेबलावरील टेलिफोनची घंटा वाजली.

" हॅलो, कोण इन्स्पेक्टर प्रधानसाहेब ? मी नाशिकरोडचा स्टेशनमास्तर बोलत आहे. आज पहाटे बाहेरच्या सिग्नलजवळ एका माणसाचं प्रेत पडलं आहे. गाडीखाली सापडून त्याचा निकाल लागला आहे. ताबडतोब कुणा पोलिसाला पाठवा..."

इन्स्पे. प्रधानांच्या नजरेसमोर जुगारी अड्डयातून पळालेला इसम, त्याचा पाठलाग, त्याचे रुळांवरून पळणे आणि मेलचे धाड्धाड् करीत झालेले आगमन आले व तो दुर्दैवी माणूस कोण याबद्दल त्यांच्या मनात शंका राहिली नाही. त्यांनी घंटी वाजवून जाधवला बोलावले व त्याला म्हटले, " अरे जाधव, आरोपी आपल्या हातून सुटला अन् यमदूतांच्या हाती लागला. चला, बिचारा कोण आहे हे तरी पाहू."

इन्स्पे. प्रधान व जाधव बाहेरील सिग्नलजवळ पोहोचले, तेव्हा सुदैवाने मयत इसमाला ओळखणारे नातेवाईक ते भयंकर दृश्य पाहायला हजर होते. त्यांपैकी एक म्हणजे सरकारी छापखान्यात काम करणारे सरकारी अधिकारी विष्णुपंत कांबळे हे होते. इन्स्पे. प्रधानांनी त्यांना विचारले, " हा गाडीखाली आलेला इसम आपला कोण ? "

" माझा धाकटा भाऊ शंकर, साहेब. हा रेल्वेतच पार्सल खात्यात नोकरीला आहे. त्याची नेमणूक सध्या कल्याणला आहे; पण सात दिवसांच्या रजेवर आला होता माझ्याकडे. कल्याणला त्याला जागा मिळाली नव्हती म्हणून त्याची बायको माझ्याकडेच राहात आहे."

" अरेरे, काय बिचाऱ्याचं नशीब !" इन्स्पे. प्रधान हळहळले. " कसलं भयंकर मरण आलं !"

शंकर कांबळेच्या शरीराचे बरोबर दोन तुकडे झाले होते व डोक्यावरही जखम झालेली होती. शरीर पडले होते, तिथे रक्ताचा सडा पडला होता. इन्स्पे. प्रधानांनी त्या सर्व परिस्थितीचा पंचनामा केला व उत्तरीय तपासणीसाठी प्रेत सरकारी दवाखान्यात पाठवले. पोलीसठाण्याला पोहोचताच इन्स्पे. प्रधानांना समजले की, मोतीलालशेटला जामिनावर सोडवण्यासाठी गावातील प्रसिद्ध वकील रामभाऊ कुलकर्णी आलेले आहेत. इन्स्पे. प्रधानांनी त्यांची भेट घेतली.

" हे पाहा, इन्स्पेक्टरसाहेब, मोतीलालला ताबडतोब जामिनावर सोडावे म्हणून मी विनंती करायला आलो आहे. कारण, जुगार खेळणं हा केवळ जामीनयोग्य गुन्हा केल्याचा त्याच्यावर आरोप आहे." रामभाऊ म्हणाले.

" आणि जुगाराचा अड्डा चालवणे असाही आरोप असणं शक्य आहे." इन्स्पे. प्रधान म्हणाले.

" तो अगदी चुकीचा ठरेल. ज्या घरावर तुम्ही छापा घातला त्याचा तुम्हांला भाडेपट्टा दाखवायला मी तयार आहे. ते घर चंपाबाई मालवणकरच्या नावावर आहे." रामभाऊ म्हणाले.

इन्स्पे. प्रधान हसले. मोतीलाल जुगार प्रतिबंधक कायद्याच्या साऱ्या पळवाटा ओळखून आपला धंदा चालवतो हे त्यांना ठाऊक होते. ते म्हणाले, "ठीक आहे. रामभाऊ, मी आरोपींचे जबाब घेतो. त्यांच्या बोटांचे ठसे वगैरे घेण्याची तजवीज करतो अन् मोतीलालच काय, सर्वांनाच जामिनावर सोडण्याची व्यवस्था करतो. मग तर झालं ? एका आरोपीची तर देवानेच कायमची सुटका केली आहे."

परंतु थोड्याच वेळात इन्स्पे. प्रधानांना या साध्या प्रकरणातच आश्चर्याचा धक्का बसणार होता. रामभाऊ गेल्यानंतर टेबलावरील टेलिफोनची घंटा वाजली. डॉक्टर माने सरकारी दवाखान्यातून बोलत होते.

"हॅलो, इन्स्पेक्टर प्रधानसाहेब का ? तुम्ही आताच शंकर कांबळेचे प्रेत पाठवले त्यात काही भानगड दिसते आहे..."

"भानगड ? भानगड एवढीच की हा एक जुगारी माणूस होता. काल मी जुगारी अड्ड्यावर छापा घातला तिथून हा पळाला. त्याच्या मागे माझे शिपाई होते. रुळांवरून पळता पळता अचानक मेलगाडी आली अन् त्याखाली हा चिरडून मेला एवढंच !"

"छे ! छे ! कुठंतरी घोटाळा झालेला दिसतोय !" डॉक्टर माने आवेगाने सांगत होते.

"शंकर कांबळेला गाडीखाली सापडून मृत्यू आलेला नाही. गाडीच्या चाकांनी झालेल्या सर्व जखमा मृत्युनंतरच्या आहेत. त्याला मृत्युपूर्व एकच जखम झालेली दिसते आहे ती म्हणजे डोक्यावरची. मृत्यू तिनेच आला असावा...."

"म्हणजे डॉक्टर ?"

"शंकरचा खून झाला आहे. त्याचं मृत शरीर रुळांवर ठेवण्यात आलं होतं यांत मला शंकाच नाही......"

इन्स्पे. प्रधान अवाक् झाले. डॉक्टर मान्यांना ते आज अनेक वर्षे ओळखत होते. उत्तरीय तपासणीच्या शास्त्राचे त्यांचे सखोल ज्ञान सुपरिचित होते. इन्स्पे. प्रधानांनी डॉक्टरांचे आभार मानले व त्यांचा रिपोर्ट लवकर पाठवण्याची विनंती करून त्यांनी फोन बंद केला. ज्याला आपण एक दुर्दैवी अपघात समजत होतो, त्या मृत्यूच्या मागे एक कुटिल रहस्य आहे, याची इन्स्पे. प्रधानांना जाणीव झाली व रहस्यभेदाला ताबडतोब सुरुवात करायची, असा निश्चय करून ते हवालदार जाधवला घेऊन विष्णू कांबळेच्या घराकडे निघाले. ते घर म्हणजे सरकारी छापखान्यातील कर्मचाऱ्यांना बांधलेल्या अनेक छोट्या बंगल्यांपैकी एक बंगला होते. इन्स्पे. प्रधानांनी आपली मोटारसायकल थांबवली, तेव्हा त्या बंगल्याच्या गेटपाशी एक पोक्तशी बाई उभी होती. ती विष्णुपंतांची बायको असावी हा इन्स्पे. प्रधानांचा तर्क खरा होता. तिचे नाव विमला. इन्स्पे. प्रधानांना पाहताच तिने विष्णुपंत सरकारी दवाखान्यांतून अजून परत आले नाहीत म्हणून सांगितले. इन्स्पे. प्रधानांना ती इष्टापत्तीच होती.

" विमलाबाई, विष्णुपंतांचा जबाब मी घेतलेलाच आहे. या परिस्थितीत घरच्या बायकामंडळींना पोलिस ठाण्यावर यायचा त्रास होऊ नये म्हणून मी इथं आलो आहे." इन्स्पे. प्रधान म्हणाले.

" जाऊबाईंनी – इंदूताईंनी – तर ही बातमी ऐकल्यापासून अंथरुणच धरले आहे. तिची बिचारीची जबाब देण्याची अवस्था नाही." विमलाबाई म्हणाल्या.

" ठीक आहे. तुम्ही माहिती सांगितलीत तरी पुरे आहे. शंकरराव रजेवर म्हणून सातएक दिवसांपूर्वी आले नाही ?" इन्स्पे. प्रधानांनी विचारले.

" होय. त्यांची बदली कल्याणला झाली; पण जागा मिळत नव्हती म्हणून जाऊबाईंना इथेच ठेवले होते. आता भावोजींना जागा मिळते आहे, पण घर-मालकाने तीन हजार रुपये पागडी मागितली. भावोजी पैशाची काही व्यवस्था होते का ते बघायला रजा घेऊन आले व तशी व्यवस्था झाल्यावर बायकोला घेऊन जाणार होते..." त्यांनी सांगितले.

इन्स्पे. प्रधानांनी विचारले, " मग काही झाली का पैशाची व्यवस्था ?"

" परवापर्यंत तर काहीच व्यवस्था झाली नाही, पण गेले दोन दिवस मात्र भावोजी म्हणत होते की, काहीतरी जमेल म्हणून ! खूप धडपड केली त्यांनी अन् शेवटी असलं मरण त्यांच्या नशिबी होतं !" विमलाबाई म्हणाल्या.

" बरं, विमलाबाई, एकच सांगा. शंकररावांच्या वाईटावर कुणी होतं ? त्यांच्याशी भांडण, शत्रुत्व असं काही ?" इन्स्पे. प्रधानांनी विचारले.

विमलाबाई म्हणाल्या, " मी बाहेरचं काय सांगणार ? पण, भावोजी फार प्रेमळ होते. मला नाही वाटत त्यांचा कुणाशी दुरावा असेल !"

इन्स्पे. प्रधानांना वाटले की, यापेक्षा जास्त माहिती मिळण्याची शक्यता नाही म्हणून ते निघण्याच्या विचारात होते तोच विमलाबाई काहीतरी आठवल्यासारखे होऊन म्हणाल्या, " तुम्ही विचारता आहात म्हणून मला एक आठवलं. परवा सकाळी भावोजी बाहेर गेले असता एक इसम आला होता व तो एक चिठ्ठी ठेवून गेला. मी भावोजी आल्यावर त्यांना चिठ्ठी दाखवली. त्यांनी ती वाचली व म्हणाले, ' कुणाला माहीत हा तरी दगा कशावरून नाही देणार ?' जेवण करून भावोजी बाहेर गेले, ते परत आलेच नाहीत..."

इन्स्पे. प्रधानांनी उत्सुकतेने विचारले, " ती चिठ्ठी आहे का तुमच्याजवळ ?"

" होय " असे म्हणून विमलाबाईंनी घरात जाऊन एक चिठ्ठी आणली. तीवर पेन्सिलीने ' उद्या भेटायला या. तुळशीराम.' एवढेच लिहिले होते. इन्स्पे. प्रधानांनी ती चिठ्ठी काळजीपूर्वक वाचून पाहिली व विचारले, " काल साधारण किती वाजता शंकरराव घराबाहेर पडले ?"

" दुपारी एक वाजण्याच्या सुमारास." विमलाबाई म्हणाल्या.

इन्स्पे. प्रधानांनी हे उत्तर ऐकले की नाही कुणास ठाऊक ! कारण, त्यांना

चिठ्ठीतील ' तुळशीराम ' हे नाव वाचताच एका व्यक्तीची आठवण झाली. त्यांना माहीत असलेला तुळशीराम हा कल्याणमधील दारूचा चोरटा धंदा करणाऱ्या टोळीचा म्होरक्या होता. त्याचा व शंकररावांचा कसा संबंध असेल, चिठ्ठीत नाव असलेला तुळशीराम म्हणजे हाच की काय, हे मात्र निश्चितपणे ठरवणे अशक्य होते. इन्स्पे. प्रधानांनी विमलाबाईंचा निरोप घेतला व या सर्व प्रकरणाचा विचार करीत करीत ते पोलीस कचेरीत पोहोचले. जमादार काळचांनी त्यांना सांगितले की, एक गृहस्थ त्यांची वाट पाहत खोलीत थांबले आहेत. इन्स्पे. प्रधान म्हणाले, " त्यांचं नाव ?"

जमादार काळे म्हणाले, " कुणीतरी बडे ऑफिसर असावेत. " तेव्हा काहीशा उत्सुकतेने इन्स्पे. प्रधानांनी ज्या वेळी खोलीत प्रवेश केला, त्या वेळी त्यांना एक उंची टेरीलिन सूट घातलेला गोरापान देखणा पुरुष खुर्चीवर बसलेला दिसला. इन्स्पे. प्रधान येताच त्याने उठून त्यांना नमस्कार केला.

" आपलं नाव ?" इन्स्पे. प्रधानांनी विचारले.

" मला तुळशीराम म्हणतात, साहेब. " त्या गृहस्थांनी उत्तर दिले.

इन्स्पे. प्रधान चकित झाले असले तरी त्यांनी तसे दाखवले नाही. " मी ऐकलं आहे हे नाव. " ते म्हणाले

" तशी पोलिसांची मेहेरबानी असते माझ्यावर. पण मी आपल्या हद्दीत धंदा नाही करीत...सिगरेट, साहेब ?" तुळशीरामने एक चांदीची सिगरेटकेस पुढे करीत म्हटले.

" No, Thanks. " इन्स्पे. प्रधान म्हणाले " तुमचं काही काम ?"

" एक मोठी भानगड होऊन बसली आहे, साहेब. मी आपल्याशी खुलंखुलं बोलायला आलो आहे. आज सकाळी मी ऐकलं की शंकर कांबळे गाडीखाली ठार झाला अन् मला वाटलं सगळा घोटाळा झाला...."

इन्स्पे. प्रधानांनी तुळशीरामकडे रोखून पाहिले व म्हटले, " त्यात भानगड काय ? असे अनेक अपघात होतात. "

" ते खरं साहेब, पण माझी हकीकत ऐका. काल शंकरला मी भेटायला बोलावलं होतं. त्याला पैशाची निकड होती म्हणून तो माझ्यामागे लागला होता. " तुळशीराम म्हणाला.

" म्हणजे तुम्ही सावकारीदेखील करता वाटतं ?" इन्स्पे. प्रधानांनी विचारले.

" साहेब, माझा धंदा असा की, सर्वजणांना सांभाळून घ्यावं लागतं. शंकरला मी तशी चिरीमिरी अनेक वेळा दिली होती, पण या वेळी तो भारी रक्कम मागत होता. मी म्हणालो, ' बाबा रे, एवढी रक्कम हवी असेल तर काही तारण ठेव. ' त्यानं ते कबूल केलं. म्हणून मी त्याला बोलावलं. काल त्याची व माझी गाठ घोटी स्टेशनवर झाली. त्यानं तारण म्हणून काही दागिने आणले होते. ते

तर चांगलेच किमती होते. मला शंका आली म्हणून मी विचारलं, 'काय शंकर राव, कुठं डल्ला वगैरे तर नाही ना मारला ?' शंकर हसला व म्हणाला, 'नहीं यार, ये तो मोहब्बतका मामला है.' मी म्हणालो, 'शाब्बास, मग हरकत नाही ! मी दागिने ठेवून घेतले व त्याला तीन हजार रुपयांच्या नोटा काढून दिल्या. बिचारा मरून गेला अन् मला वाटलं ही दागिन्यांची जोखीम आपल्या गळ्याला फास लावील. समजा असला हा माल चोरीचा...म्हणून सरळ आपल्याकडे आलो साहेब...' असे बोलून तुळशीरामने कोटाच्या आतल्या खिशातून रुमालात बांधलेली एक चपटी डबी काढली व ती उघडली. तिच्यामध्ये सोन्याचा सुमारे वीस तोळ्यांचा हार होता. त्यास हिरवेगार पाचूचे लॉकेट होते. तसेच लाल खरे खडे जडवलेल्या चार सोन्याच्या बांगड्या होत्या. इन्स्पे. प्रधानांनी हे जयपुरी पद्धतीचे दागिने आहेत हे ओळखले.

"तुळशीराम, शंकरचा व तुमचा व्यवहार साधारण किती वाजता झाला ?" इन्स्पे. प्रधान म्हणाले.

"चार वाजण्याच्या सुमारास. त्याला परत जायची घाई होती व नाशिककडे जाणारी गाडी होती लगेच. मी त्याला गाडीत बसलेला पाहिला." तुळशीराम उत्तरला.

"अच्छा, तुळशीराम, तुमचा माझ्यावर विश्वास असेल तर ही पेटी, रुमाल अन दागिने इथंच मजजवळ राहूद्या आणि उद्या सकाळी तुम्ही परत या. मला याबाबत शंकरच्या भावाजवळ चौकशी करावी लागेल." इन्स्पे. प्रधान.

"हे काय बोलणं झालं साहेब ? आपल्यावर पूरा विश्वास म्हणून तर आलो..." एवढे बोलून 'नमस्ते' करून तुळशीराम गेला. ताबडतोब इन्स्पे. प्रधानांनी विष्णु-पंत कांबळेला घेऊन येण्यास हवालदार जाधवला सांगितले. या प्रकरणाची गुंतागुंत सुटण्याऐवजी ती अधिकच वाढत आहे हे ते समजून चुकले. शंकरने तुळशीरामला दिलेले दागिने कुणाचे आणि त्याच्याजवळ असलेल्या तीन हजार रुपयांच्या नोटांचे काय झाले, हे दोन नवीन प्रश्न निर्माण झाले होते. इन्स्पे. प्रधान या समस्यांची उकल कशी करावी याचा विचार करीत असतानाच हवालदार जाधवने विष्णुपंत कांबळ्याला हजर केले. त्याचा चेहरा काळजीने व दुःखाने काळवंडून गेला होता.

"विष्णुपंत, शंकररावांची पुढली सर्व क्रिया वगैरे झाली ?" त्यांनी विचारले.

"होय साहेबा आताच आटोपून आलो..." विष्णुपंत.

"तुम्हांला खरं म्हणजे या वेळी मी इथं यायची तकलीफ द्यायला नको होती; पण माझा नाइलाज झाला." इन्स्पे. प्रधान म्हणाले, "काही गोष्टींचा मला तुमच्याकडून उलगडा हवा आहे. शंकररावांना घरासाठी पागडी म्हणून द्यायला पैसे हवे होते हे खरं का ?" इन्स्पे. प्रधान.

"होय. त्यांची व्यस्था करायलाच तो रजेवर आला होता. मी त्याला काही

मदत करू शकलो नाही. पण परवाच तो म्हणत होता की, काहीतरी व्यवस्था झाली म्हणून." विष्णुपंत.

"त्याने आपल्या बायकोचे दागिने तर विकले अगर गहाण ठेवले नाहीत ना ?" इन्स्पे. प्रधानांनी विचारले.

"बायकोचे दागिने ? साहेब, गरिबाची थट्टा करता वाटतं ? शंकरला नोकरीला लागून दोनच वर्षं झाली. लग्नात बायकोच्या अंगावर मंगळसूत्र माझ्याच पैशानं चढवलं. त्यानंतर शंकरनं गुंजभरदेखील सोनं घेतलं असेल असं मला वाटत नाही. तो कुठले दागिने गहाण ठेवणार ?" विष्णुपंत.

इन्स्पे. प्रधानांनी आपल्या भात्यातील बाण काढला. "मग मला हे सांगा विष्णुपंत, ह्या गरिबीतल्या शंकरला शेकडो रुपयांचे स्टेक असलेल्या मोतीलालच्या जुगारी अड्ड्यात जायला कसं परवडतं ?"

"शंकर, जुगारी अड्ड्यात ? छे: ! छे: ! शक्य नाही. आपला काही गैरसमज..." विष्णुपंत.

"माझ्या चांगला समज झालेला आहे." इन्स्पे. प्रधान काहीशा कठोर आवाजात म्हणाले. "काल मी मोतीलालच्या जुगारी अड्ड्यावर छापा घातला. जुगाऱ्यांनी दिवे विझवून पळायचा प्रयत्न केला. तो इतर कुणाला साधला नाही. फक्त एकजण निसटला व कंपाऊंडच्या भिंतींवरून उडी मारून पळाला. माझे शिपाई त्याच्यामागे होते. रुळांवरून पळू लागला अन् ट्रेनखाली सापडला. हा तुमचा भाऊ शंकर मेला नसता तर आज तुम्हांला त्याच्या हातात हातकड्या दिसल्या असत्या."

इन्स्पे. प्रधान हे बोलत आहेत तो विष्णुपंतांनी टेबलावर डोके ठेवले व ते रडू लागले. "नाही, नाही, इन्सपेक्टर साहेब, तो तर गेला, पण त्याच्यावर हा खोटा आरोप मी येऊ देणार नाही. पळालेला इसम शंकर नव्हता साहेब, तो मी होतो... मी." ते म्हणाले. इन्स्पे. प्रधान या अनपेक्षित कबुलीने चकित होऊन गेले.

"कोण, विष्णुपंत तुम्ही ? एवढ्या शिताफीने पळालात ?" इन्स्पे. प्रधान.

"होय, साहेब. मीच तो नालायक. चांगली सरकारी नोकरी...संसार असूनही या व्यसनात असा गुरफटलो आहे की, या मोहातून माझी सुटका कठीण आहे..." विष्णुपंत.

इन्स्पे. प्रधान विचार करीत म्हणाले, "मला एक सांगा विष्णुपंत, आमच्या तावडीतून मोतीलालदेखील निसटू शकला नाही ते तुम्हांला कसं जमलं ?"

"केवळ मोतीलालशेटची कृपा, साहेब..." विष्णुपंत उत्तरले.

"मोतीलालशेटची ? ती कशी काय ?" इन्स्पे. प्रधान.

"आपला छापा पडला. मोतीलालनी त्यांच्या पायाजवळचे बटन दाबून सर्व दिवे विझवले. मोतीलाल माझ्या कानांत पुटपुटले, 'विष्णुपंत, तुम्ही सरकारी नोकर... तुम्ही पोलिसांच्या हाती सापडता कामा नये. चला, तुम्हांला रस्ता दाखवतो...'

अंधारात सर्व गोंधळ माजला होता. मोतीलालनी हात धरून मला भिंतीपाशी नेले. तिथे भिंतीत बसवलेल्या कपाटाचे दार होते, पण ते कपाट नव्हतेच. शेजारच्या खोलीत जायचा तो दरवाजा होता. शेटनी मला त्यातून ढकलले. म्हणाले, 'असंच सरळ पळत जा. मागील भिंत लागेल. तिथून उडी मारा. तुमचं घर रेल्वेलाईन पलीकडेच आहे. घरात जाऊन स्वस्थ बसा...' मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागलो... मोठ्या थोर मनाचा मोतीलाल, साहेब !"

अनेक वेळा या अड्ड्यावर छापा घालून पोलिसांच्या हाती मोतीलाल का लागला नाही, याचा उलगडा इन्स्पे. प्रधानांना आता झाला. परंतु त्याचबरोबर आणखी काही शंकाही निर्माण झाल्या.

"विष्णुपंत, तुम्ही म्हणता ते खरं असेल तर मग मोतीलालही तुमच्याबरोबर का नाही पळाला ?" इन्स्पे. प्रधानांनी विचारले.

"ते मी काय सांगू साहेब ? पण मला वाटतं, त्याला साथीदारांना सोडायचं नव्हतं !" मोतीलालच्या या थोरपणाचे व उदारतेचे इन्स्पे. प्रधानांना नवल वाटत होते. त्यांनी टेबलावरची घंटा वाजवली. जमादार काळे आत आले. "जमादार, विष्णुपंतांना इथंच काही वेळ थांबू द्या. जुगारी आरोपींचं काम कुठपर्यंत आलं आहे ? "

"सर्व संपत आलं आहे, साहेब. फक्त ठसे घ्यायचे राहिले आहेत." जमादार काळे.

"हे पाहा जमादार, मी बाहेर जातो आहे. मी परत येईतो हे ठशाचं काम पुरं झालं नाही पाहिजे. सर्व आरोपी मी येईपर्यंत इथंच हवे आहेत...आणि जाधवला सांगा राणी कुत्रीला घेऊन जीप आणायला.'

दहाच मिनिटांत इन्स्पे. प्रधान, हवालदार जाधव, दोन शिपाई 'राणी'सह जीपमधून भर वेगाने मोतीलालच्या जुगार अड्ड्यापाशी आले. छोटासा बगीचा व भोवताली भिंत असलेला तो एक लहानसा बंगला होता, त्याची सर्व दारे, खिडक्या बंद दिसत होत्या व गेटापाशी एक भला धिप्पाड भय्या सोटा घेऊन राखण करण्यासाठी उभा होता. इन्स्पे. प्रधानांनी जीप थांबताच खाली उडी टाकली व शिपायांना भय्याला ताब्यात घेऊन जीपमध्ये बसवण्यास सांगितले. नंतर राणीला साखळीतून मुक्त करीत म्हटले, "Search Ranee, Search" राणी उड्या मारीत निघाली. वास घेत घेत ती बंगल्याच्या मागील बाजूस गेली. तिथे एक गॅरेजवजा खोली होती. तिच्या दरवाजाला बाहेरून कुलूप होते. राणी त्या बंद दरवाज्यापाशी जाऊन जोरजोराने भुंकू लागली, इन्स्पे. प्रधान व जाधव तिच्या मागोमाग गेले. त्यांनी दोन दारांच्या फटीतून पाहण्याचा प्रयत्न केला. आत संपूर्ण अंधार असल्याने त्यांना काही दिसले नाही पण कुणाचा तरी कण्हण्याचा आवाज मात्र ऐकला. इन्स्पे. प्रधानांनी क्षणाचाही विचार न करता कुलूप फोडून दरवाजा उघडला. उजेडाचा स्रोत आत शिरताच इन्स्पे. प्रधानांना एक करुण दृश्य दिसले.

एक वीस बावीस वर्षांची देखणी तरुणी गॅरेजच्या जमिनीवर अस्ताव्यस्त पडली होती. तिच्या तोंडात बोळा घालून त्यावर रुमाल घट्ट बांधला होता. तिचे हातपाय देखील दोरी बांधून जखडले होते. जाधव व इन्स्पे. प्रधानांनी खिशातून चाकू काढून दोरी कापून काढली व तोंडावरील रुमाल सोडला.

"बाई, तुम्ही कोण ?" इन्स्पे. प्रधानांनी विचारले.

"मी...चंपा..." अशी सुरुवात तिने केली. इन्स्पे. प्रधानांना तिच्याकडून सर्व हकीकत समजून घ्यायला बराच त्रास झाला. तिला मारहाण झाली होती व अन्न-पाणी न मिळाल्याने ती बरीच अशक्त झाली होती. इन्स्पे. प्रधानांनी तिची दवा-खान्यात रवानगी केली व ते घाईघाईने पोलीस कचेरीत येऊन हजर झाले.

जमादार काळेने त्यांना सलाम करून विचारले, "जुगारी केसच्या आरोपींना सोडायचे का ?"

इन्स्पे प्रधानांनी तुळशीराम आणलेल्या पेटीला बांधलेला रुमाल सहज ठेवल्या-सारखा टेबलावर ठेवला. " सोडायचेच. फक्त मोतीलाल शेठला सांगा, मला भेटून जा." इन्स्पे. प्रधान म्हणाले.

थोड्याच वेळात मोतीलाल आत आला.

"बसा ना शेठ थोडा वेळ ! तुमची व माझी कामाच्या गर्दीमुळे नीटशी मुलाखत झालीच नाही."

मोतीलालने मग्रूरीने उत्तर दिले, "कोर्टात ती होईलच की !"

तेवढ्यात जाधव आला व म्हणाला, "साहेब, विष्णुपंत कांबळे भेटू इच्छितात."



" त्यांना पाठव आत. मोतीलालशेट, मी जास्त वेळ घेत नाही तुमचा. जरा बसा."

मोतीलाल नाखुशीनेच पण नाइलाजाने बसला. विष्णुपंत आत आले. मोतीलालला पाहताच ते जरा दचकले, पण इन्स्पे. प्रधानांनी त्यांना बसण्याचा इशारा दिला. " विष्णुपंत, मी तुम्हांला आतापर्यंत सांगितलं नाही, पण आता सांगतो... तुमचा भाऊ शंकर, अपघातात मेला नाही.... त्याचा खून झाला." विष्णुपंत ताडदिशी उभे राहिले व म्हणाले, " खून ! साहेब तो तर गाडीखाली..."

" नाटक होते ते ! सर्वांची फसवणूक करायला. शंकरच्या डोक्यावर कुणीतरी लाठीचा एवढा जोराने प्रहार केला होता की, तो एकाच घावात खलास झाला. रूळावर ठेवले गेले ते त्याचे प्रेत..."

" पण साहेब ?" विष्णुपंत केविलवाणेपणाने म्हणाले, " त्या बिचाऱ्याने कुणाचं वाकडं केलं ?"

" विष्णुपंत," इन्स्पे. प्रधान हसून म्हणाले, " जग साधं राहिलं नाही. लहानपणापासून तुमच्याजवळ वाढलेल्या शंकरचं गेली चार वर्षं एका गरतीबाईशी प्रेम प्रकरण चालू होतं. तुम्हांला कोडं पडलं होतं की शंकरला पैसे मिळाले कुठून ? या बाईने स्वतःचे म्हणजे तिला दिलेले दागिने त्याला दिले. पण इथंच इतके दिवस गुप्त राहिलेल्या प्रकरणाला या बाईच्या मोलकरणीकडून वाचा फुटली अन् शंकरच्या खुनाचा कट तयार झाला. त्याला बोलावणे गेले. शंकर बेसावधपणे गेला कारण, त्याला ठाऊक होते की बाईचा यजमान जुगार खेळण्यात गुंग असेल. शेटचा इशारा मिळताच शेटच्या नोकराने एका टोल्यात शंकरला परलोकाला पाठवलं. पण प्रेताची वाट कशी लावायची ? शेटने शंकरच्याच अंगावर मिळालेले तीन हजार रुपये नोकराला बक्षीस दिले व प्रेत रूळावर ठेवले गेले. शेटने बाईच्याही मुसक्या आवळल्या. शेटला स्वतःला निरपराधी म्हणून दाखवायचे होते. तो पुन्हा जाऊन जुगार खेळत बसला. पोलिसांचा छापा आला, पण शेटला आज पळायचे नव्हते, पकडले जायचे होते. त्यांना जाऊ द्यायचे होते फक्त एकाला, जो गुप्त राहील अन् ज्याला जुगारी म्हणून पळालेला ओळखेल तो शंकर."

विष्णुपंत इन्स्पे. प्रधानांकडे बघत राहिले. मोतीलालशेटचा चेहरा घर्मबिंदूंनी डबडबला होता. अभावितपणे त्यांनी तो पुसण्यासाठी टेबलावरील रुमाल उचलला. इन्स्पे. प्रधान आपल्याकडे पाहत असल्याचे लक्षात येताच तो त्यांनी घाईघाईने खाली ठेवला.

" छे ! छे ! मोतीलालशेट, आपलाच आहे तो रुमाल ! आपल्या दागिन्यांची पेटी ठेवायला वापरला गेला होता. जुगारी जगात शेट तुम्ही अजिंक्य आहात, पण या खुनाच्या जुगारात मात्र हरलात !" इन्स्पे. प्रधान बोलले.

□ □

# पुस्तके


## तीन कादंबऱ्या

**घोषवती**
**रात्र कधी संपूच नये**
**कलंकिता मी कशी**

**प्रा. चंद्रशेखर बर्वे**

मराठी साहित्यात नवनव्या कृतींची भर वेगाने पडत आहे. साऱ्याच कृती मोलाच्या आहेत असे म्हणता येणार नाही. पण काही कृती लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. म्हणून त्यांची दखल घेतली पाहिजे एवढं मात्र खरं! अशाच तीन साहित्यकृती आज माझ्यापुढे आहेत. पहिली श्री. देवरूखकर यांची 'घोषवती', दुसरी प्रा. तामणे यांची 'रात्र कधी संपूच नये,' आणि तिसरी सौ. दसनुरकर यांची 'कलंकिता मी कशी?' ज्या क्रमाने या कृतींचा उल्लेख केला, त्याच क्रमाने त्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.

या तीनही कादंबऱ्या आहेत. त्या वाचल्यानंतर जाणत्या वाचकाच्या मनात एखाद्या वेळी असा प्रश्न येईल की, खरोखर खऱ्या अर्थाने या कादंबऱ्या आहेत का? खऱ्याखुऱ्या कादंबरीत अनेक पातळ्यांवर उलगडले गेलेले अनेकपदरी कथानक असते, खऱ्याखुऱ्या कादंबरीचा परिणाम बहुविध–बहुमुखी असतो. आपण ज्या कृती वाचल्या त्यांत असे काही आढळते का? मला वाटते, हा तात्विक प्रश्न तूर्त बाजूलाच ठेवलेला बरा! इथे एक साधा व्यावहारिक प्रश्नच विचारात घ्यावा हे अधिक योग्य! या साहित्य-कृती वाचनीय आहेत की नाहीत? असल्या तर कशासाठी? या एकाच प्रश्नाच्या अनुरोधाने त्यांचा परामर्श मी घेणार आहे.



'**घोषवती**' ही उदयन राजाच्या पराक्रमाची

कहाणी. भारतावर शिकंदराचे आक्रमण झाले, त्या आधी सुमारे शंभर दीडशे वर्षे हरवामणी साम्राज्याचा सेनापती आरूणी याचे आक्रमण झाले होते. पराक्रमाची शर्थ करून उदयनाने ते पुरते मोडून काढले. आणि नंतर राज्याराज्यात ऐक्य निर्माण करण्यासाठी त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अशा या प्रतापी, ध्येयवादी राजाची गाथा म्हणजे ' घोषवती '.

उदयन महापराक्रमी होता, तसा ललितकलांतही निपुण होता. वीणावादनात तर तो विलक्षण प्रवीण होता. वादनाचे पाठ देतादेताच राजकन्या वासवदत्ता हिच्या प्रेमाची जोड त्याने केली, ' घोषवती 'मध्ये उदयनाच्या वीणाझंकाराचे, त्याच्या प्रेमसंगीताचेही वर्णन आलेले आहे. पण ' घोषवती ' चा रोख उदयनच्या राजकीय क्षेत्रातल्या अतुल कर्तृत्वाच्या वर्णनाकडेच आहे.

" राजा हा राज्याचा असतो. राज्यासाठी कर्तव्य बजावताना त्याला स्वतःच्या सुखदुःखांचा विचार करता येत नाही. " हे अमात्यांचे म्हणणे उदयनने अक्षरशः खरे केले. एकदा अमात्यांशी बोलतांना त्याने स्वतःच सांगितले आहे " माझ्या अंतःकरणात असलेल्या साध्या माणसाचे मन मी आवरून धरले, " हे करताना उदयनाच्या मनाची ओढाताण कशी झाली, त्याच्या अंतःकरणात कोणती खळबळ उसळली, तिच्यातून तो बाहेर कसा पडला याचे सूक्ष्म दर्शन ' घोषवती 'त फारसे घडत नाही. वैयक्तिकतेच्या घरट्यातून बाहेर पडलेल्या एका तेजस्वी राजाचं, त्याच्या राष्ट्रनिष्ठेचं, त्याच्या धुरंधर नेतृत्वाचं दर्शनच अधिक घडतं.

या दर्शनातून एक आदर्श प्रतिमा उज्ज्वल रूपात सामोरी येते. तशी ती यावी, एवढंच नव्हे तर तर ती प्रेरक ठरावी अशीच " घोषवती "चे लेखक श्री. देवरूखकर यांची अपेक्षा असावी. " या आर्यावर्तात राज्यं अनेक असली तरी परक्या शत्रूसाठी सबंध आर्यावर्त एक आहे. " " आपल्या राज्यापेक्षा भारतवर्ष जास्त श्रेष्ठ आहे, " अशी वाक्ये संवादांतून येतात, तेव्हा तर असे वाटते की उदयनाच्या गाथेतून एक संदेश आजच्या भारतपुत्रांनी घ्यावा अशीही श्री. देवरूखकर यांची अपेक्षा असावी.

आदर्श – संदेश यांचा भलताच भार उदयनाच्या कथेवर त्यांनी टाकलेला नाही. म्हणूनच ही कथा कुठेही जडावलेली नाही. तशी ती अगदी बंदिस्त, घडीव, तशीच आहे, पण तिला जड शिलारूप आलेले नाही. तिच्या अंगोपांगांतून कमालीचा जिवंतपणा आहे–मग ती वातावरणनिर्मिती असो, ते प्रसंगचित्र असो, अथवा ते व्यक्तिदर्शन असो.

अडीच हजार वर्षांपूर्वीच्या काळातले एक धीरोदात्त चरित्र ' घोषवती ' च्या रूपाने मराठीत प्रथमच जिवंत झालेले आहे. विषयाचे वेगळेपण आहेच पण चित्रणातही निराळेपण आहे. भास, हर्ष यांच्या संस्कृत नाटकांतल्या उदयनापेक्षा निराळा उदयन–नुसता प्रेमिक नव्हे, तर प्रतापी उदयन–श्री. देवरूखकरांनी चित्रित केला आहे. केवळ या दोन गोष्टींसाठीदेखील ' घोषवती ' जिज्ञासा वाढवणारी

ठरली तर ते स्वाभाविकच म्हणावे लागेल.

'**रात्र कधी संपूच नये**' या पुस्तकाचा विषय तसा अगदी वेगळा नाही, आणि त्याचे कथारूपही जुने साचे मोडून टाकणारे नाही. एक तरुण वकील. बायकोच्या शीलाबद्दल जहरी संशय. तिची आत्महत्या. दुसरी बायको असमंजस. एकलेपणा असह्य. वकिलाची तमाशापर्यंत मजल. दुःखी नर्तिका. एकमेकांविषयी सहानुभूती. दोन दिवसांसाठी लोकांपासून दूर दूर गिरिनिवासात वास्तव्य. नर्तिकेला पळवल्याचा आरोप. वकिलास अटक,..इत्यादी इत्यादी...बाकीचे मुळातूनच वाचावे

हे ऐकताना, 'पुढचं प्रत्यक्षात पडद्यावरच पाहा' या वाक्याची आठवण अनेकांना होईल. आतापर्यंत आपण एखाद्या चित्रपटाची गोष्ट तर ऐकली नाहीना, असेही मनात येईल. असे काही मनात यावे असेच 'रात्र कधी संपूच नये'च्या कथानकाचे टप्पे आहेत. आणि या टप्प्यांवरून झालेली कथानकाची धावही चलत् चित्रपटाला साजेशीच आहे. गतिमान, नाट्यपूर्ण, धक्के देणारी, वेधक दृश्ये एका पाठोपाठ एक उभी करणारी, वेधकता शेवटपर्यंत कायम राहावी यासाठी सुरवाती-पासूनच 'फ्लॅशबॅक' चे तंत्र, गूढ कागदपत्रे, रहस्ये अशा अनेक युक्त्याप्रयुक्त्यांचा उपयोग लेखकाने–प्रा. तामणे यांनी कौशल्याने केला आहे.

'फ्लॅशबॅक'चे तंत्र म्हणून जे तंत्र वापरण्यात आलेले आहे ते सर्वार्थानी 'फ्लॅशबॅक'चे तंत्र आहे का? 'साइड ट्रॅक' या चित्रपटात जसे ते अटळ आहे, तसे इथे आहे का? वाचकाला भावकथेच्या पातळीवर घेऊन जाऊ शकणाऱ्या पुस्तकांत रहस्यकथेच्या पातळीवरच्या युक्त्यांचा उपयोग केला जावा का? असे प्रश्न या संदर्भात उद्भवतातच. पण या प्रश्नापेक्षा, या युक्त्या किंवा 'ते' तंत्र यांच्या साहाय्याने तरी प्रा. तामणे यांनी काही विशेष काही साधले आहे का? हा प्रश्न अधिक महत्वाचा आणि, साधले आहे, पुस्तकात वेधकता चांगलीच निर्माण केली आहे. हेच, त्या प्रश्नाचे उत्तर.

असे म्हटल्यावरही एक सांगितलेच पाहिजे की ही वेधकता विशिष्ट मर्यादेपर्यंतच टिकते. कथानकाच्या गुंफणीतले कच्चे दुवे लक्षात येऊ लागले की, ती कमी होऊ लागते. नायकाच्या पहिल्या बायकोची आत्महत्या ही पायाभूत घटना. पण हा पायाच भुसभुशीत वाटतो. चाणाक्ष नायकाच्या हातात पत्रे पडतात, तेव्हा त्यावर तो एकदम निःशंकपणे विश्वास ठेवतो, लगेच घरी जाऊन आकांडतांडव करतो, त्याने कधीनवत तांडव केलेले असते. तरी त्याची बायको तत्काळ आत्महत्या करण्यास प्रवृत्त होते. हे सगळे तडकाफडकी घडते. त्यामुळेच एकीकडून ते सनसनाटी झाले आहे, पण दुसरीकडून त्याची विश्वसनीयता (reliability) उणावली आहे. असं सनसनाटी, अविश्वसनीय शेवटपर्यंत घडत राहिलेले आहे.

उत्कृष्ट भावकथा लिहिण्याचे सामर्थ्य असूनही प्रा. तामणे यांना सेन्सेशनल घट-नांचा मोह का होतो, हे कळत नाही ! त्यांच्या सामर्थ्याची प्रतीती प्रस्तुत पुस्तका-

तही येते. पहिल्या बायकोबरोबर मनःशांती गेलेली. दुसरीने जखमेवर फुंकर घालण्याऐवजी मीठ चोळलेले, तिसरी जीवनात येते, ती दैवाने दिलेली हुलकावणी वाटते. अशा विचित्र परिस्थितीत सापडलेल्या नायकाचे मनोदर्शक प्रा. तामणे यांनी बारकाईने घडवले आहे. दुसरीपासून तो कसा दुरावत जातो आणि त्याच वेळी तिसरीकडे हळूहळू आकृष्ट कसा होतो याचेही चित्रण त्यांनी अनेक प्रसंगांतून सावकाशीने चांगले केले आहे. दोन समदुःखी जीव हिलस्टेशनवर जवळ कसे येतात आणि आपल्याला शेवटी दूर व्हावे लागणार आहे हे आतून कळलेले असल्यामुळे कासावीस कसे होतात हेदेखील त्यांनी हळुवारपणाने संयमाने दाखवले आहे, ' रात्र कधी संपूच नये ' मधला हा अत्यंत विलोभनीय असा भाग !

अविश्वसनीय व विलोभनीय यांचे मोठे मजेदार मिश्रण या पुस्तकात झालेले आहे. म्हणूनच ते वाचताना खडूच्या ठिसूळ कांडीवर ठेवलेले काचेचे चमचमते झुंबर आपण पाहत आहोत असे वाटते. नुसतं झुंबर पाहिलं तर आनंद. पण खडू मोडला तर झुंबराचे काय, ही भीती. असा संमिश्र अनुभव ' रात्र कधी संपूच नये ' हे पुस्तक वाचताना येतो.

जवळजवळ याच प्रकारचा अनुभव ' कलंकिता मी कशी ' हे पुस्तक वाचतानाही येतो. कारण, या पुस्तकातही योगायोग, अपघात, यांमुळे कृत्रिमता व मनोविश्लेषण, भावविश्लेषण, त्यातली सूक्ष्मता असे मिश्रण आहे. यामधे सूक्ष्मता अशी आहे की कृत्रिमतेचा विसर पडावा.

तसे पाहिले तर याही पुस्तकाचे कथानक प्रेमाच्या त्रिकोणावरच आधारलेले आहे. एका बिंदूवर अच्युत, दुसऱ्यावर महेश–अच्युतचाच धाकटा भाऊ व तिसऱ्यावर माधव–अच्युतच्या बायकोचा बालसोबती. तिघांनाही सुशीला हवी होती. दैवयोगाने अच्युत तिचा स्वामी झाला. महेश तिचा तिरस्कार करू लागला आणि माधव तिच्या दारी पाहुण्यासारखा उपरा ठरला. अच्युत, महेश, माधव यांच्या सुशीलाशी असलेल्या किंवा नसलेल्या संबंधांची कथा ' कलंकिता मी कशी ? ' या पुस्तकात सौ. दसनूरकर यांनी सांगितली आहे.

त्यांचा भर आहे तो मात्र माधव व सुशीला यांच्या बालपणापासूनच्या संबंधांवर. त्यांना शेवटपर्यंत करकचून बांधून ठेवणाऱ्या अतूट, रेशमी भावबंधावर. अच्युतशी विवाह झाल्यावर सुशिला कठोर होते, माधवची स्मृती पुसून टाकण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करते. माधव तिच्याभोवती घोटाळत नाही, पण तिच्या अभावी रिकामी राहिलेली जागा दुसऱ्या स्त्रीला देण्याचे टाळतो. शेवटी "तू असा विरक्त, एकाकी राहतोस, प्रयत्न करूनही मी तुला विसरू शकत नाही," असे सुशीला कळवळून सांगते. तेव्हा तिच्यासाठी–तिला तिच्या संसारात पूर्णपणे रमू देण्यासाठी–स्वतः विवाह करायला, आपल्या भावी संसारात रमायला माधव तयार होतो. माधवचा वत्सलेबरोबर विवाह होतोही, पण दैवाने डाव भलताच मांडलेला

असतो. अच्युतला अपघाती मरण येते, सुशीला एकटी पडते, तिला पुरुषी सोबतीची गरज भासते, त्याच वेळी योगायोगाने तिच्याच गावी माधवची बदली होते. आणि दोघेही आसक्तीच्या चक्रव्यूहात सापडतात, त्यातच गुदमरतात. हे बारकाईने दाखवण्यावर सौ. दसनूरकर यांचा भर आहे.

हे त्यांनी फार परिणामकारक रीतीने दाखवले आहे. सुशीला माधवने दिलेले पेन ब्लाऊझच्या गळ्याला अडकवते इथपासून, सुशीला इहलोक सोडून गेल्यावर खिडकीच्या गजांवर डोके टेकून माधव सूर्यास्त पाहत राहतो इथपर्यंत, घडून आलेल्या प्रसंगांची–विशेषतः, माधव-सुशीला यांच्या भेटीच्या अनेक गुंतागुंतीच्या प्रसंगांची-चित्रे या दृष्टीनं मुळातूनच पाहण्याजोगी आहेत. कुठेही संयम जरासुद्धा न सोडता, पण प्रसंग सपक होऊ न देता सौ. दसनूरकर यांनी ही चित्रे काढली आहेत. ही चित्रे हृदयस्पर्शी आहेतच. पण त्यांनी माधव, सुशीला यांच्या मनाचे भावनांचे जे पापुद्रे उकलले आहेत ते तर हृदयद्रावक आहेत. आजूबाजूच्या लोकांनी, आप्तस्वकीयांनी, एवढेच नव्हे तर सुशीलाच्या सज्ञान मुलाने दोघांचा निषेध-धिक्कार सुरू केल्यावर झालेली त्यांची अवस्था, त्यांच्या मनातलं थैमान, त्यांची ससेहोलपट, त्यांना भोगाव्या लागलेल्या यातना या साऱ्यांचे सौ. दसनूरकर यांनी घडवलेले दर्शन अगदी व्याकुळ करणारे आहे.

म्हणूनच ‘ कलंकिता मी कशी ? ’ वाचल्यावर एक-दोन प्रश्न अस्वस्थ करतात. सूक्ष्म धाग्यांची गुंतागुंत उकलणाऱ्या या कथेत मधूनमधून अती ढोवळपणा का यावा ? कथानक घडवण्यासाठी आकस्मिक घटनांचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्याऐवजी कथानक घडून गेलेले आहे असे समजून, त्यातले टप्पे गृहीत धरून पूर्वप्रकाशन फ्लॅशबॅक पद्धतीने ही कथा सांगितली गेली असती तर ती अधिक परिणामकारक ठरली नसती का ?

पण असल्या प्रश्नांनी येणाऱ्या या अस्वस्थतेपेक्षा, माधव-सुशीला या निष्कलंक प्रेमिकांवर व्यवहारी जगाकडून पापाचा शिक्का मारला जातो. शुद्ध असलेल्या, पण अनावर झालेल्या दोघांच्या भावनाच त्यांना गिळंकृत करतात, यातला विचित्र विरोध जाणवल्यामुळे येणारी अस्वस्थता जास्त तीव्र वाटते. अशा अस्वस्थेतही एक आनंद मिळतच राहतो. सौ. दसनूरकर यांच्या चित्रणातल्या कलात्मक अलिप्ततेपासून, आर्टिस्टिक डिटॅचमेंटपासून, आणि तेवढ्यासाठीच ‘ कलंकिता मी कशी ? ’ हे पुस्तक पुन्हा वाचावेसे वाटते.

☐

[ पुणे आकाशवाणीच्या सौजन्याने ]



# बहिर्जी नाईक अंतराळात !

दादूमिया

'मॉडर्न मेडिसिन्' नावचे अतिशय प्रसिद्ध अमेरिकन मासिक आहे. त्याच्या संपादकांनी परवा चिडून एक संपादकीय लिहिले, " या दोन शक्तीशाली राष्ट्रांनी या अंतराळ रॉकेटस्वर काय अफाट खर्च चालविला आहे उगाच. तेवढा खर्च अमेरिकन जनतेच्या स्वास्थ्यासाठी केला तर ती जनता दुवा देईल ! या अंतराळ स्पर्धेचा कोणास उपयोग होणार आहे? "

हे एका प्रसिद्ध अमेरिकन डॉक्टरचे वक्तव्य व अगाध ( अ ) ज्ञान! असे वक्तव्य भारतीय पुढाऱ्यांनी केले तर मी समजू शकतो. शास्त्राचा, संरक्षणाचा त्यांना काहीच गंध नसतो. पण सुप्रसिद्ध अमेरिकन संपादकाने असे म्हणावे ?

कारण ' अंतराळ–संशोधन–कार्यक्रम ' हे नाव गोंडस असले तरी त्याच्या मागे त्या राष्ट्राचे संरक्षण जास्त चांगल्या तऱ्हेने व्हावे हा उदात्त पण स्वार्थी हेतू असतो. आजकालच्या Total war च्या जमान्यात ह्या रॉकेट्स्चेही सहाय्य संरक्षणासाठी घ्यावे लागते. चंद्रावर जाणे, मंगळावर मानववस्ती आहे का त्याचा शोध करणे हे आपले दाखवायचे दात !'

रशियन पंतप्रधान क्रुश्चेव यांनी दुसऱ्या महायुद्धातील जगप्रसिद्ध बनलेल्या मार्शल झुकॉव्हला एकदम बडतर्फ केले. सहाजिकच पक्षातील अधिकारी त्यांच्यावर

खवळले. त्यांनी विरोध केला. क्रुश्चेव हसत हसत म्हणाले, "वेड्यांनो, एक झुकॉव्ह आज गेला पण तो दुसरा झुकॉव्ह पाहा अमेरिकेभोवती फेऱ्या मारीत आहे ! झुकॉव्हचा विरोध या अंतराळातील रॉकेट्स्वर होता." लोकांना क्रुश्चेव्ह काय म्हणत आहे ते प्रथम समजेना. क्रुश्चेवने स्पुटनिककडे बोट दाखविले !

अमेरिकेत लोकशाही असल्यामुळे तेथे बऱ्याच गोष्टी – अगदी संरक्षणाच्यादेखील– गुप्त राहू शकत नाहीत. रशियात वृत्तपत्रांचे राष्ट्रीयीकरण केल्यामुळे सामान्य जनतेस व परदेशी हेरांना चटकन् सैनिकी गुपिते कळू शकत नाहीत. पूर्वी अमेरिकेस ही मोठी अडचण होती. त्याचप्रमाणे चीनमध्ये काय चालते याचाही पत्ता लागत नसे. आज ही गुपिते आकाशातील रॉकेट्स्मुळे उघडी झाली आहेत. चीनने पहिला अणुबाँब व पहिला हायड्रोजन बाँब फोडला याची फोटोसहित बातमी सर्वप्रथम अमेरिकेने जगास दिली ! बिचारे भारत, अजून ते या शास्त्राच्या संबंधात झोपलेले आहे !

हे अंतराळातील बहिर्जी नाईक परदेशाची कोणची गुपिते उघड करु शकतात ? शत्रूराष्ट्राचे विमानतळ, मिसाईलस् प्रक्षेपण केंद्रे, सैन्यसंख्या, सैन्याच्या हालचाली व सैन्यास होणाऱ्या पुरवठ्याविषयी माहिती हे बहिर्जी नाईक इमानेइतबारे आपल्या राष्ट्रास त्यांचा रिपोर्ट देत असतात. ही बातमी तावडतोब दिली जाते. शिवाय या बातमीदारास शत्रुराष्ट्रे पकडूही शकत नाहीत. हे 'सुभाष' चंद्र (बालचंद्र) अमेरिकेसाठी रशिया, चीन व जर्मनी यांच्यावर सतत नजर राखून आहेत !

या बालचंद्रावर अतिशक्तीशाली कॅमेरे बसविलेले असतात.अंतराळात १५० मैलांवरील अंतरावर बारा इंचांपेक्षा थोडी कमी उंची असलेल्या वस्तूचाही फोटो हे कॅमेरे घेऊ शकतात ! हे कसे शक्य होते ?

त्याचे श्रेय अतिप्रगत असलेल्या शास्त्रास द्यावे लागेल. दुसऱ्या महायुद्धात रडारचा शोध लागला व पाणबुड्यांचे भय कमी झाले. आज रडारचे शास्त्र खूपच प्रगत झाले आहे. सांगावयास अभिमान वाटतो की भारतीय शास्त्रज्ञही या रडारच्या क्षेत्रात (अमेरिकेत) खूप पुढे गेलेले आहेत ! हे रडार ढगांच्या आरपार जाऊ शकतात व जंगलांना 'अडथळा' समजत नाहीत. ह्या जंगलांत व टेकड्यांत लपविलेल्या मिलिटरी इन्स्टॉलेशन्स्चे ज्ञान रडारच्या सहाय्याने आपल्याला चटकन् होते.

इन्फ्रा रेड फोटोग्राफी व सेन्सॉर्स यांचे शास्त्र अतिशय प्रगत झाले आहे. भारत पाकिस्तानच्या १९६५ सालच्या युद्धात कोणीही यशाचे श्रेय जवान, लालबहादूर-शास्त्री किंवा आपले वैमानिक यांना देतील. मी ते सारे श्रेय इन्फ्रा रेड रॉकेट्स्नाच देईन. पॅटन् टँक्स् गरम असतात. त्या गरम वस्तूचा शोध घेत घेत ह्या रशियन रॉकेट्सनी पॅटन टँक्स्चा मर्मभेद केला. तीच गोष्ट आकाशातील विमानांची. भ्रमर

फुलाच्या सुगंधाने आकर्षित होऊन नेमका फुलावर झेप घेतो ना ? तेच तत्व अंतराळातील बहिर्जी नाईक वापरतो. मिसाईल लॉंचिंग् पॅडस् तर सोडा, पण साधी ट्रकदेखील हे इन्फ्रा रेड् सेन्सॉर्स पकडू शकतात. रशियात मध्यंतरी, Anti-ballistic missiles ' चे उत्पादन खूपच वाढले होते व ते सध्या मंदावले आहे, ही बातमी या शोधामुळे अमेरिकेस ताबडतोब कळू शकली. रशियाची लॅंड् बेज्ड मिसाईल्स्ची (रॉकेट्स्) संख्या आज अमेरिकेच्या रॉकेटसंख्येएवढी आहे हेही या इन्फ्रा रेड् सेन्सॉर्समुळेच ! चीनची सारी अणु–गुपिते यांच्याच जोरावर अमेरिका सचित्र जाहीर करु शकते !

हे बहिर्जी नाईक अमेरिकेने प्रथम १९६३ साली आकाशात सोडले अमेरिकन हवाई खाते, संरक्षण खाते, युनिव्हर्सीटयांतील संशोधन खाती यांनी सहकार करून आज हजारो उपग्रह अंतराळात सोडलेले आहेत. हे उपग्रह अवकाशात एक ते पंचवीस दिवस साधारणतः टिकतात. एक सुसज्ज उपग्रह लॉंचिंग् पॅडवर सदान्कदा तयारच ठेवतात. जरुर वाटली की बटण दाबून त्यास लगेच वर सोडतात ! ही सारी तयारी लॉस एजल्स्पासून १२५ मैलांवर असलेल्या व्हांडेनबर्ग या पॅसिफिक महासागरावरील ठिकाणी चालते. हे उपग्रह एका ध्रुवापासून दुसऱ्या ध्रुवाकडे (Polat-orbit) घुमत असतात. हेतू हा की, पृथ्वीवरील कोणचेही ठिकाण दिवसातून एकदा तरी या उपग्रहावरील ठेवलेल्या यांत्रिक हेराच्या तावडीतून सुटू नये !

या उपग्रहावरील कॅमेऱ्याचे बटण खाली विमानतळावर शास्त्रज्ञांच्या हातात ठेवलेले असते. शत्रूराष्ट्रांवर उपग्रह फिरू लागला की, हे शास्त्रज्ञ उपग्रहांवरील सिनेकॅमेरे चालू करतात. शत्रूराष्ट्र व हे कॅमेरे यांच्यातील अंतर सुमारे १०० ते ३०० मैल असते ! बटण दाबले की टेलीव्हिजनच्या सहाय्याने ही सारी चलतचित्रे खाली जमिनीवरील शास्त्रज्ञांना विनासायास मिळतात. आज बाजारात जे टेलिव्हीजन् सेटस् उपलब्ध आहेत त्यांच्यापेक्षा हे उपग्रह टी. व्ही. सेट्स् कमीत कमी हजार पट समर्थ असतात ! आज ते जास्तच समर्थ व उपयोगी असतील ! ! (त्या आधारावर तर जपानने आपले रंगीत टी. व्ही. सेट्स् अमेरिकन बाजारात लोकप्रिय करून सोडले ! )

या उपग्रहाचा दुसरा कार्यक्रम जास्त मनोरंजक आहे. हे उपग्रह शत्रुराष्ट्राची माहिती घेतलेला चलत् चित्रपट एका तीन फुटी व ३०० पौंड वजन असलेल्या कॅपसुल (डबी)मध्ये भरतात व पृथ्वीकडे ही डबी रॉकेट्स्च्या साहाय्याने दूर फेकली जाते. अमेरिकन एअर फोर्सची सी – १३० विमाने या डब्यांचा मार्ग रडारच्या साहाय्याने बरोबर शोधून काढून त्यांच्याजवळ येतात. ही डबी पृथ्वीच्या जवळ (म्हणजे Atmosphere मध्ये) आली रे आली, की ती रेडिओ संदेश सुरू करते. सी – १३० विमाने साहजिकच हे संदेश पकडतात व पाठलाग चालू होतो.

ह्या डबीतून पॅरॅशूट उघडले जाते व भगवी–पांढरी पॅरॅशूट, असलेली ही डबी विमानातील लोक 'एअर–हूक'च्या साहाय्याने खेचून घेतात. समजा, जर ही डबी पकडली गेली नाही तर ती शत्रुराष्ट्राच्या हेरांच्या हाती जाऊ नये, म्हणून ती जमिनीवर किंवा पाण्यावर पडताच तिचा नाश व्हावा, अशी योजना केलेली असते. ह्या डबीत पूर्वी काळ्या–पांढऱ्या फिल्म्स् असत. आज त्याऐवजी रंगीत फिल्म्स् उपलब्ध आहेत. या फिल्म्सचे रिपोर्ट्स् ताबडतोब वॉशिंग्टनला धाडण्यांत येतात. विशेष महत्वाची बातमी आली, तर त्यावर राष्ट्राध्यक्ष व सैनिकी जनरल्स् व तज्ज्ञ यांची चर्चा होते.

आमच्याकडे २० ऑक्टोबर १९६२ च्या आधी पंतप्रधान, संरक्षण मंत्री व इतर मुख्य मंत्री सारे परदेशाच्या दौऱ्यावर होते ! चिन्यांना हाकला हा महत्त्वाचा हुकूम सरीन नावाच्या संरक्षण खात्यातील चिटणिसाने सही करून हिमालयाकडे रवाना केला. तीन वर्षांनंतर संरक्षण–खात्यातील एका प्रमुख अधिकाऱ्यास मी उपग्रहातील यांत्रिक हेराची माहिती सांगू लागताच हा सरदारजी हसून मला म्हणाला, " जी क्या बंडल फेंकते हो ! मेरा जर्मन कॅमेरा तो बारीशमेंभी काम देता नहीं है और आप दो सो मीलके फोटोग्राफीकी बात कर रहे हो ! " मी कपाळास हात लावला.

गेल्या दोन वर्षांत Integrated उपग्रहांची मदत घेण्यात येत आहे. प्रत्येक उपग्रहाचे काहीतरी वैशिष्टच ठेवण्यात आले आहे. वजनाच्या भीतीने एकाच उपग्रहावर सारी यंत्रे बसविणे रास्त नसते. त्याशिवाय एकाच उपग्रहावर सारी यंत्रे बसविली व तो उपग्रह चुकीने नष्ट झाला तर कोटयावधी डॉलर्सचा चुराडा होईल. संरक्षणखात्यात एका विमानाने सारे मुख्य अधिकारी कधीच प्रवास करीत नाहीत. (अपवाद भारताचा. काश्मीरमध्ये एका हेलिकॉप्टरने हवाई खात्यातील सहा सर्वोत्कृष्ट अधिकाऱ्यांचा बळी घेतला ! )या सहकारी पद्धतीमुळे कम्युनिस्ट देशांची लष्करी गुपिते आता काही सेकंदांच्या आत " detect, record and transmit " होऊ शकतात.

'फेरेट' उपग्रह यासाठी उपयोगात आणतात. २२ फूट लांब व ५ फूट रूंद अशी ही ३०० पौंडी रॉकेट्स् मॉस्को शहरावरून दिवसास दोनदा प्रदक्षिणा घालतात. 'Strategic Air Command' पूर्वी बेकायदेशीर ठरविला गेला; पण या अंतराळात फिरणाऱ्या फेरेटला कोणचा पोलिस उभा हात दाखविणार ? या फेरेटमुळे रशियाची खरी गळचेपी झाली आहे. साधा नाविक नौकेवरून पाठविलेला संदेशदेखिल या फेरेटच्या तडाख्यातून सुटत नाही ! दोन लष्करी युनिट्स्मध्ये चाललेले वायरलेस संभाषण हे फेरेट पकड शकतात. झेकोस्लोवाकियाविषयी रशियात काय लष्करी हालचाल चालली होती हे या फेरेटने अचूक जाणून अमेरिकन तज्ज्ञांना बातम्या पुरविल्यां. अमेरिकेच्या प्रचारखात्याने बोंबाबोंब करून

झेकोस्लोवाकियाचा 'हंगेरी' वा 'पोलंड' होणार होता, ते वाचविले! कोणी नेहरू वा मेननने समजा, रशियाच्या बाजूने वकिली केलीच तर त्यांना टेप रेकॉर्डेड संदेश ऐकवून थप्पड द्यायची अमेरिकेची आज तयारी आहेच.

'मिडास' रॉकेट्स्‌विषयी आपण वर्तमानपत्रांतून खूप वाचतो. हे 'मिडास' म्हणजे Missile Defence Alarm System चे छोटे रूप होय. रशियन व चिनी आंतर-खंडीय मिसाईल्स्‌चे ज्ञान या मिडासमुळे होते. या मिडासवर इन्फ्रा रेड सेंसॉर्स बसविलेले असतात. हे सेंसॉर्स प्रवाही नायट्रोजन किंवा हेलियम् यांच्या मदतीने रेफ्रिजरेटरमध्ये पाण्याच्या बाटल्या थंड ठेवल्या जातात त्याप्रमाणे एकदम थंडगार ठेवतात. त्यामुळे अत्यंत दूर अंतरावर असलेली 'गरम' मिसाईल्स् हे सेंसॉर्स चटकन् समजू शकतात. फक्त एक डझन मिडास रॉकेट्स् जर अंतराळात फिरती ठेवली तर रशियातील साऱ्या मिसाईलसचे ज्ञान चोवीस तासांतील 'प्रत्येक क्षणी' अमेरिकेस उपलब्ध होईल. ही बातमी मिळाली रे मिळाली की, लगेच 'Strategic Air Command'ची बाँबर विमाने आपल्या अणुबाँबने या मिसाईल्स्‌चा नाश काही मिनिटांत वा तासांत पार पाडू शकतील.

'वेला' उपग्रह शत्रुराष्ट्रांतील अणुचाचण्या शोधण्यासाठी अमेरिकेस उपयोगी होत आहे. 'वेला' उपग्रहांचे वजन ७५० पौंड असते व ती जोडीने अंतराळात फिरतात. दीड वर्षपर्यंत ही जोडी भटकत राहते. अणुबाँबच्या चाचण्या बंद करा-व्यात असा तह साऱ्या मोठ्या राष्ट्रांनी मागेच केला. चीन व फ्रान्स यांनी ह्या तहास भीक घातली नाही. या 'वेला' उपग्रहांच्या मदतीने जगातील कोणत्याही भागात अणुचाचणी झाल्यास समजू शकते. पूर्वी स्फोटामुळे जमीन हादरे व या कंपांची नोंदणी सिस्मोग्राफवर झाल्यामुळे कोठेतरी धरणीकंप किंवा (धरणी-कंपाच्या पट्ट्यात नसल्यामुळे) अणुस्फोट झाला, असे निदान केले जाई. आज त्या जुन्या पद्धतीची गरज उरलेली नाही.

गेल्या वर्षापासून अमेरिका व रशिया यांच्यांत माणसे असलेली उपग्रह-स्थानके सोडण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. चंद्रावर जाणे वगैरे हेतू सामान्य माणसांसाठी ठीक आहे. 'आंतरः कोऽपि हेतुः' जाणून घेणे हे जाणकारांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ह्या उपग्रहांचा उपयोग फक्त संरक्षणासाठी शत्रूराष्ट्राची बित्तंबातमी गोळा करण्याकडे केला जातो. दोन दोन महिने हे अंतराळवीर अवकाशात फिरत राह-तील व शत्रुराष्ट्राची सारी माहिती गोळा करून स्वराष्ट्रात 'प्रोसेस' करण्यासाठी धाडून देतील. हे मोठे उपग्रह टिटान् ३-एम रॉकेटच्या साहाय्याने अवकाशात धाडले जातात. या उपग्रहांवर कॅमेरे व इलेक्ट्रो–मॅग्नेटिक सेन्सॉर्स असतात. रडार बीम व रेडिओ संदेश, रेडिओ टेलिफोन व जहाजांवरील लहान लहान संदेश हे उपग्रह आपल्या अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने उचलून आतील तंत्रज्ञांना पुर-वितील. अंतराळवीर हे साधे पायलट नसतात हे ध्यानात ठेवले पाहिजे.

चौ–एन–लायने आपल्याबरोबर शंभर लष्करी तज्ज्ञ आणले होते. भारतात पं. नेहरूंनी त्यांना मिलिटरी ॲकेडमीपासून ते भाक्रा–नानगलपर्यंत सर्वत्र हिंडून दिले. 'भाई भाई' ना ते आपले! भाई भाईस आपले ऐश्वर्य दाखवायचे नाही तर कोणास ते दाखवायचे? या उपग्रहांवरील कॅमेऱ्यांनी जे काम करावयाचे ते या चिनी लष्करी तज्ज्ञांच्या डोळ्यांनी टिपून घेतले व आज ते भांडार चिनी संरक्षण खात्याच्या फाईलसमध्ये सारे सुरक्षित आहे!

एक रशियन इंजिनीअर मला म्हणाला, "तुमच्याकडे संरक्षणाच्या जबाबदारीची जाणीव लहानापासून मोठ्यापर्यंत का नाही? संरक्षणाविषयी कुतूहल दिसते, पण तेही वरवरच." काय कपाळ सांगणार त्यास, की आमचा देश अजून गांधीवादाच्या 'सत्य' व 'अहिंसा' यांच्या प्रचारात अडकून पडला आहे!

मला सर्वांत दुःख होते ते आमच्याकडील सुशिक्षित वर्गाच्या Apathy-चे. ह्या वर्गास आज संरक्षणाविषयी काहीही सोयरसुतक नाही. त्यामुळे 'टाईम' वा 'लाईफ' वा 'न्यू टाईम्स्' (मॉस्को) यांत छापून आलेल्या कोणत्याही बातमीवर ते विश्वास ठेवतात. स्वतःने Analyse करण्याची बातच नसते. शिक्षणाचा हा अर्थ मोठा घातुक आहे.

उदाहरणार्थ, अमेरिकेने व्हिएटनाममधील 'ऑपरेशन' बंद वा मंद केले ते काय आशियातील मानवजातीवर त्यांची एकदम भूतदया जागृत झाली म्हणून? छे! छे! अमेरिकेत 'स्वराष्ट्रहित' हीच सर्वांत मोठी भूतदया समजतात. चीन व रशियाने केलेली शस्त्रास्त्र मदत आज व्हिएटनाममध्ये संपुष्टात आलेली आहे. दुसरे असे की, व्हिएटनामचे युद्ध अमेरिकेचा अफाट पैसा खात आहे. त्यामुळे अंतराळ–उपग्रह–स्पर्धा बिचारी गरीब होत आहे. तेथे पैसा कमी पडत आहे. म्हणून तेथील तज्ज्ञ आरडाओरड करीत आहेत. व्हिएटनाममध्ये पैसा ओतण्यापेक्षा दक्षिण आशियन राष्ट्रांना थोडीशी लाच (याने मदत!) द्या, खूष ठेवा व आपला अवकाश–ग्रह–कार्यक्रम जोरात चालू ठेवा, असा लकडा शास्त्रज्ञांनी अमेरिकेच्या अध्यक्षांमागे लावला आहे.

आमचा सुशिक्षित वर्ग हे सारे परदेशी प्रचाराच्या मागील गुपित केव्हा समजून घेईल?

त्यासाठी आपल्याकडे 'संरक्षण–जागृतता' निर्माण झाली पाहिजे.

भारतात अवकाश–ग्रह–शास्त्र व अणु–शास्त्र यांचे जाणकार लोक अजिबात नाहीत, असे नाही. त्या शास्त्रात खुद्द महाराष्ट्राचा वाटा नेत्रदीपक आहे.

□ □

 [ पृष्ठ २३ वरून ]

जो आप मुझे दे रहे हैं वो खुषीसे दे रहे है ना ?'

" जी हाँ ! " मी गडबडीने म्हणतो. " ऐसा मानीये की आपसे मुलाकात करनेकेही वास्ते हम कलकत्ता आये हैं. आपका शुभनाम ?"

" यू. एन्. सिंग. "

" क्या बात है ? " स्कूटरच्या मागच्या सीटवर बसत, स्कूटर चालू झाल्यावर मी बोलतो. " आप के. एन्. सिंगसे कुछ कमी नहीं हैं। "

लाच खाणारे आपण पुष्कळच पाहिले. पण इतक्या आपुलकीने आणि ऐटीत तोहफा घेणारा हा यू. एन्. सिंग पहिलाच !

डमडम एअरपोर्ट. सुशील धारांच्या विमानाची वाट पाहत मी व 'स्टेट्समन'चे चीफ प्रेस फोटोग्राफर श्री. एस. रॉय तळपत्या उन्हात उभे आहोत. एक तास होऊन गेला आहे. रॉयबाबू बडा दिलचस्प माणूस. दुसऱ्या वॉरपासून पाकिस्तान वॉर-पर्यंत फ्रंटवर जाऊन आलेला ! चेहऱ्यावर 'किती सांगू तुला' हा भाव !

" चंद्रशेखर, या कलकत्त्यात मी अनेक वेळा मार खाल्ला आहे. "

" अँ ?" मी.

" अरे, हे लोक फोटो काढू देत नाहीत. कॅमेरा पळवतात. मोडतात. पण तरीही मी काही उत्तम स्टडीज मिळवले आहेत. उद्या तू कचेरीत ये. तुला दाखवतो. "

मला कोणीतरी अदृश्य शक्ती सांभाळून घेत असावी. आपली स्टोरी अधिक 'रिच' करण्यासाठी काही फोटो घेण्याचा माझा विचार होता. रॉयबाबूंकडे पाहून मी तो विचार सोडून दिला. कलकत्त्याच्या लोकांना आधीच मारामारीचे बिझी शेड्यूल आहे. त्यांना तरी किती त्रास द्यायचा !

धारांचे विमान येत नाही. रॉयबाबूंच्या गप्पा चालूच. बंगाली माणूस कसा आहे ते रॉय मला हलक्या आवाजात समजावून सांगत आहेत. त्यांच्या शेजारी एक बंगाली कुटुंब आहे. त्या बाबूला अठरा पोरे आहेत. अकरा मुले आणि सात मुली. मुले गुंडगिरी करतात आणि मुली डबल ग्रॅज्युएट आहेत.

" यू सी ?" आकाशाकडे आशेने पाहत रॉय मला विचारतात.

" रॉयसाहाब, 'सरोवरा'ची एखादी खास तस्बीर खेचली की नाही ? मला निदान बघू द्या. "

" शू ऽऽ ! " आपला कॅमेरा सावरीत रॉय बोलतो – " तुला वाटेल एखादी नेकेड ब्यूटीची तस्बीर पाहायला मिळेल ! यू रास्कल ! तुझी निराशा करावी लागते याचे मला दुःख होते. "

कोठले तरी विमान आले म्हणून रॉय एअरफील्डकडे पळत सुटतात. मी गेट-वर उभा.

एक-दोन मिनिटांत मोठा कालवा ऐकू येतो. मी चपापून बघतो. विमानवाल्यांची एक मालवाहू वॅगन कोणा बंगाल्याच्या अगदी जवळून गेली होती. दहावीस बंगाली त्या ड्रायव्हरच्या अंगावर तुटून पडले होते. विमानाच्या आवाजाच्या वर त्यांचा आवाज येत होता. त्यांनी चक्क घोषणा देण्यास सुरुवात केली. किती वेळ ते प्रकरण चालू होते.

धाराबाबू आलेच नाहीत. त्याऐवजी बंगला काँग्रेसचे सुकुमार रॉय आले. डोमेस्टिक लाऊंजमध्ये शिरताना त्यांनी फाईव्ह फाईव्ह, फाईव्हचे पाकिट काढले आणि सर्वांना फिरवले. रॉयनी त्यांची एक तस्वीर खेचली. तडतडत्या बंगालीत सुकुमारजी काही बोलले आणि निघून गेले !

रॉयना मी म्हटले, "यार, सुकुमारबरोबर माझा फोटो का काढला नाही ?'

"अरे, हा फोटो फेक आहे. उगाच त्याला बरे वाटावे म्हणून काढलेला !" रॉय मोठ्याने हसतात आणि आम्ही डमडमच्या बाहेर पडतो. चियांग बारमध्ये एकएक बियर उठवून झाल्यावर मी रॉयचा निरोप घेतो. माझे हात हातात घेत रॉय बोलतात.

"चंद्रशेखर, रात्री बेरात्री कोठे बाहेर जाऊ नकोस ! गुडलक."

कलकत्यात हिंडताना अनेक बंगाली मंडळी भेटली. काहींशी ओळख झाली. काहींनी तोंड फिरवले ! दोघेही बरेच काही सांगून गेले.

बंगाली जीवन म्हणजे विरोधाभासाचे एक कडबोळे आहे. तेथे मुली नक्षलवादी घोषणा करीत हिंडतात पण रात्री सातच्या पुढे बाहेर जात नाहीत. सी. पी. एम्.ला प्रचंड पाठिंबा आहे. त्याचबरोबर एखाद्या गुरूची रक्षा विसर्जन करण्याच्या मिरवणुकीत लाखो लोक सामील होतात व चित्तरंजन रस्त्यावरची वाहतूक त्यासाठी तासनतास विस्कळीत होते. बंगाली माणूस जगाशी नाते जोडण्याची भाषा करतो पण बिगर बंगाल्याशी चकार शब्द बोलत नाही.

श्रमिकांच्या सामर्थ्यावर तेथले सरकार उभे आहे पण श्रमिकांमध्ये बंगाली फार थोडे. टेबलाशी बसून तोंड चालवणे हे बंगाली माणसाचे आवडते काम ! एकमेव ऑबसेशन म्हणजे पुढारीपण करायचे. श्रमिकांचे, बिगरबंगाल्यांचे, भारताचे, जागतिक साम्यवादी चळवळीचे !

हे पुढारी अनुयायांकडे जात नाहीत. अनुयायी आपणाकडे येण्याची वाट पाहतात. पण सगळेच पुढारी असल्याने कोणीच कोणाकडे येत नाही. सगळेच कोठेतरी जात आहेत; कोठे ते कोणास सांगता येत नाही !

पुढारीपण तर राहोच, साधे माणूस म्हणून जगावयाचे तर सभोवतालच्या परिस्थितीशी काही नाते जोडावे लागते हे त्यांच्या गावी नाही. कलकत्ता शहरात एक धावती चक्कर टाकली तर त्या शहराची अतीव दुरवस्था जाणवते. कलकत्ता कॉर्पोरेशनचे चीफ् इंजीनियर श्री. एस. मित्रा यांनी ही दुरवस्था अगदी ग्राफीकली

उभी केली. ते म्हणतात,

"यंग मॅन! कॅलकटा इज अॅज गुड अॅज गॉन! माझ्यामागच्या या सर्व शेल्फांत काय आहे ठाऊक आहे? हे आहेत कलकत्त्याच्या विकासाचे आराखडे! मी स्वत: तयार केलेले! पण पैसा नाही. आपल्या नोकरांना पगार द्यायला कॉर्पोरेशनजवळ पैसा नाही. विकास कसला करतोस?"

कलकत्त्याचे नागरी प्रश्न बुद्धीला मूढ करणारे आहेत. पण एवढे खरे की, कलकत्ता कॉर्पोरेशन आपली शर्थ करीत आहे–शहर 'चालू' ठेवण्याची! माझ्या मते कलकत्त्यातील सर्वांत कार्यक्षम संस्था म्हणजे कलकत्ता कॉर्पोरेशन. या ऑफिसात मी केवळ एक तास होतो.

सेक्रेटरी, हेल्थ इंजीनियर, चीफ इंजीनियर या तिघांना मी भेटलो. त्यांनी दहा-दहा मिनिटांत मला थोडक्यात कल्पना दिली आणि सर्व उपलब्ध प्रकाशने ताबड-तोब माझ्या हवाली केली!

मित्रासाहेब म्हणाले, "चंद्रशेखर, प. बंगालचे निम्मे प्रश्न आम्हांला पुरेसा पैसा मिळाला तर सुटतील."

मित्रासाहेबांची धडाडी दांडगी आहे. भट्टाचारजींची (सेक्रेटरी) कामाची पद्धत नमुनेदार आहे. पण दुर्दैव असे की, आज कलकत्त्यात सर्वसाधारण माणसाला सगळ्यांत जास्त राग येत असेल तर तो कॉर्पोरेशनचा!

राज्यकर्ते आपले बळ ग्रामीण भागातून पैदा करतात. कलकत्ता त्यांच्या लेखी किस झाडकी पत्ती! त्यामुळे होते काय, की जवळचे दिसत नाही आणि लांबचे विसरत नाही. व्हिएटनामच्या यातनांनी विव्हल होणारे बंगाली (आम्ही आमच्या पित्याला विसरू पण वियतनामला कधीही विसरणार नाही!) कलकत्त्यातील अनेकविध यातनांबाबत पूर्णपणे उदासीन आहेत!

विश्वास ठेवा, सामान्य कलकत्तेकर आज एखाद्या युद्धापेक्षाही अधिक हाल-अपेष्टांना तोंड देत आहे. पावसाळ्यात कित्येक प्रमुख रस्ते कालवे बनतात. वाहतूक विस्कळीत होते. रोज पीकअवर्समध्ये बसमध्ये शिरणे हे स्वर्गाच्या एखाद्या महालात शिरण्यासारखेच दुष्कर आहे. घरून ऑफिसला जाणे व रात्री घरी येणे ही सगळ्यांत मोठी अॅचीव्हमेंट!

शहराच्या या राक्षसीपणामुळे प्रत्येक वर्ग दुसऱ्या वर्गापासून तुटून पडला आहे. विषमता एवढी पराकोटीला गेली आहे की ती आता कोणालाच जाणवत नाही. दमचकवाल्याला (हातरिक्षा) महिन्याला जेवढे पैसे मिळत नाहीत तेवढे दिवसाला दरडोई घेणारी अलिशान हॉटेले येथे आहेत व ती सर्व वर्षभर पूर्णपणे भरलेली असतात. डलहौसी, चौरंगी, एस्प्लनेड, चित्तरंजन, बडाबाजार, लेक प्लेस, गारियाट, या भागांचे एक जग आणि बिधनसरनी रोड, अलिमुद्दीन स्ट्रीट, हजरा रोड, यांचे एक जग! सबंध कलकत्ता आज दुभंगलेले आहे!

श्रीमंत, लक्ष्मीपुत्र आपल्या होम टु ऑफिस—ऑफिस टु क्लब या रूटीनमध्ये गुंग असतात हे नवल नाही. पण जगाचे परिवर्तन् करण्यासाठी निघालेले बंगाली विचारवंत, साम्यवादी कार्यकर्तेदेखील त्यांच्या चाकोरीतच कैद असतात. ऑफिस, संध्याकाळी कॉफी हाऊस, रात्री एखादा सिनेमा, बस. खलास ! गरीब वर्ग आपल्या चाकोरीत मग्न असतो असे म्हणणे हा क्रूरपणा आहे. पण ते सत्य आहे ! परिणाम असा की आपले प्रश्न काय, आपली ताकद काय, आपले एकमेकांशी नाते काय हे कोणासही कळत नाही. चटकू, आगरवाल, असीमकुमार, अण्णा पंडित, प्रशांतो सरकार, प्रभाकर गाडगीळ, बख्तावरसिंग सारे सारे हे मान्य करतात की काही तरी केले पाहिजे. करता येईल. पण करणार कोण ?

हजरा रोडपासून एस्प्लनेडला जाताजाता दोनचार घेरावो दिसतात, एखादी मिरवणूक दिसते, एखादा सत्याग्रह दिसतो. रायटर्स बिल्डिंगसमोर तर रोज कसला ना कसला मोर्चा येत असतो. सरळ चाललेली वाहतूक पाहता पाहता बंद पडते. लोक स्वस्थपणे उभे राहतात, किंवा चालत राहतात.

कलकत्त्याचे मन फार सार्वजनिक झाले आहे. एका अर्थाने हे साम्यवादी चळवळीचे यश म्हणता येईल; पण या सार्वजनिक जाणिवेमध्ये केव्हाही, कोठेही, कसलीही कार्यशक्ती दिसत नाही. काही नवीन घडवण्याची रग दिसत नाही. एक दिशाशून्य व गतिशून्य कोलाहल एवढेच त्याचे स्वरूप आहे.

बंगाली लोक फार संवेदनाशील आहेत असे म्हणतात. ते खरे असेलही; पण माझ्या मते त्यांची संवेदनाशक्ती आता व्यक्तिगत राहिली नाही, तर सार्वजनिक झाली आहे. त्यामुळे त्यांना सार्वजनिकतेची जाणीव नसावी हे स्वाभाविक ! पण बाहेरून आलेल्याला मात्र ही सार्वजनिक पर्सनॅलिटी फार जाणवते. त्याला घुसमटून टाकते. तिचे वांझ आणि जहांबाज स्वरूप त्याला नकोसे होते. शहरात बसेसची संख्या अगोदरच कमी असताना कलकत्ता रोज एक तरी बस न्याहारीला घेत असते.

हे निरर्थक आहे. सार्वजनिक हावरटपणापुढे आजवर सार्वजनिक मालमत्तेचा बळी दिला जात आहे. येथून पुढे खाजगी मालमत्तेचा दिला जाईल. काही कारण नसताना !

या ठिकाणी आणखी एक महाविनोदी विरोधाभास जाणवतो. सुरुवातीच्या काळात तरी पूर्णपणे सरकारवादी असलेल्या साम्यवादी राजवटीत असणारी सरकार नावाची चीज आज प. बंगालमध्ये अस्तित्वात नाही. प्रबंध आणि निर्बंध या दोन्ही क्षेत्रांत सरकार आज प्रभावहीन आहे. पैसा नाही म्हणून विकास नाही, विकास नाही म्हणून स्वतः सरकारच लोकांना 'डायरेक्ट ॲक्शन'ने मालमत्ता बळकावण्यास उत्तेजन देते. या 'डायरेक्ट ॲक्शन'मुळे सरकारचे निर्बंधित शासनही कोलमडल्यासारखे वाटते.

सरकारी कामे साम्यवादी सरकार लोकांच्याकरवी करून घेत आहे याचा परिणाम बंगाली मनावर फार झाला आहे. जर लोक सर्वच काही परभारे करू

शकतात तर मग सरकार कशाला, निवडणुका कशाला, लोकशाही कशाला ?

या भूमिकेस खतपाणी घालण्यात मध्यम वर्ग पुढे आहे. या वर्गाला श्रवण शक्ती चांगली व भाषण शक्तीही अमोघ ! पण नजर जरा अधू ! आज आपण सरकार या संस्थेविरुद्ध वातावरण तयार करीत आहोत– उद्या हा प्रयत्न यशस्वी झाला तर मध्यमवर्गच नामशेष होईल ! सरकार ही संस्था मध्यमवर्गीयांना जीवित हेतू मिळवून देण्यासाठी स्थापन झाली आहे ! कारण श्रीमंत व गरीब या दोघांनाही सरकारचे काही सोयरसुतक नसते. मध्यमवर्गीयाला ते असते. कारण त्याला सरकार चालवावे लागते.

बंगाली मनाच्या अशा चिरफळचा किती दाखवाव्या ? चलनवाढीप्रमाणे बेबंद– शाहीदेखील स्वतःचे इंधन स्वतः निर्माण करीत असते. बेबंदशाहीमुळे बेबंदशाहीचे वाढते आकर्षण व त्यामुळे अधिक बेबंदशाही असे हे चक्र आहे !

याचा अर्थ कलकत्ता शहरात कसलीच सुरक्षितता नाही असा नव्हे. मुलांचे शाळेचे डबे वगैरे खाण्याच्या वार्ता खोडसाळपणाच्या आहेत. सर्वसाधारण व्यवहार सुरळीत चालू आहेत. जो काही विस्कळीतपणा आहे तो 'सार्वजनिकते'मुळे निर्माण होतो. प्रस्थापित गुंडगिरी सोडल्यास इतर कोणीही फारसे वाईट वागत नाही. तेवढे त्राण त्यांच्यात नाही.

पण पाण्यामध्ये रेघ ओढता येत नाही. बंगाली जीवन पाण्यासारखे आहे- सरोवर, सरिता, सागर, अशा अनेक स्वरूपांत असले तरी पाणी ते पाणीच ! त्याला ना स्वतःचा रंग ना रूप ! बंगाली जीवन पाणी असले तरी पाण्याचा एक गुणधर्म त्याच्यात नाही– ते उताराकडे धावणारे नाही ! त्याला चढणीची आस आहे. उंच हवेचे आकर्षण आहे. या त्याच्या ईर्षेपायी त्याने सध्या समीराची मन-धरणी चालवली आहे. समीराचा झपाटा पाहून ते मोहीत झाले आहे. आपले इप्सित समीरच सामोरे आणू शकेल असा त्याला गाढ विश्वास आहे.

या साम्यवादी समीराची अनेक रूपे आहेत. बुद्धिवादी झुळुक, कार्यवादी झंझा-वात, कार्यक्रमवादी वारे, आणि परिक्रमवादी तुफान अशा अनेक रूपांनी आज समीर सलीलाला खुणावीत आहे. वेडे खुळे सलील हे विसरत आहे, की समीर कितीही आकर्षक वाटला तरी त्याचे नाते अविरोध आकाशाशी आहे. ज्या आकाशात देशांच्या, राष्ट्रांच्या सीमा नसतात.

आकाशपुत्र समीर आणि भूमिकन्या सरिता यांचे मीलन पाहणे ही ध्येयवादाची परिसीमा होय. पण बंगाल हीही सीमा ओळखत नाही. समीर आपल्याला दगा देतो की काय, ही शंका त्याला चाटून जात असून त्याने दुसऱ्या एका प्रेरणेकडे तोंड वळवण्यास सुरुवात केली आहे– सिकता ही ती प्रेरणा !

साम्यवादी समीर सलिलाला हेलकावे देऊ शकतो, पण नक्षलवादी सिकता त्याच्या आवाक्याबाहेर आहे. म्हणून तो बेभान होऊन सैरावैरा धावतो आहे– धापावतो आहे. [ क्रमशः ]

# नियमितपणें वापरल्यानें फोन्हान्स टूथपेस्ट हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालते

तरुण तसेंच वयस्कर लोकांकडून आलेली अनाहूत प्रशस्तीपत्रें हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालण्यात फोन्हान्स टूथपेस्टला मिळालेल्या आश्चर्यजनक यशाची स्तुति करतात. ही प्रशस्ती पत्रें जेफ्री मॅनर्स ॲन्ड कं. लि. च्या कोणत्याहि कार्यालयात पहावयास मिळतील.

"मला दांतांच्या विकाराचा त्रास होत असे. मी आपली फोन्हान्स वापरू लागलो. आता मला दांतांचा कोणताच विकार नाहीं. सुमारे २० ते २५ लोक आधीची टूथपेस्ट बदलून फोन्हान्स वापरू लागले आहेत. आणि माझ्या कुटुंबात तर ती सर्वात **अत्यंत** आवडती होऊन राहिली आहे."

—उदयशंकर तिवारी, पाटणा.

"शास्त्रीय पद्धतीने बनविलेली आपली **फोन्हान्स टूथपेस्ट** गेली दहा वर्षे मी वापरीत असून तिच्यामुळे माझे **हिरड्यांचे** सर्व विकार दूर झाले. आता माझ्या कुटुंबातील सर्वजण **फोन्हान्स टूथपेस्टने** नियमितपणे दांत घासतात."

—एस. एम. लाल, नवी दिल्ली.

**दांतांची योग्य निगा राखण्यासाठीं फोन्हान्स टूथपेस्ट व फोन्हान्स दुहेरी कार्य करणारा टूथब्रश दर रात्रीं व सकाळीं वापरा...आणि आपल्या दंतवैद्याकडे नियमितपणें जात चला!**




**मोफत! "दांतांची व हिरड्यांची निगा" नामक रंगीत पुस्तिका**

ही पुस्तिका आपल्याला मराठी, हिंदी अथवा इंग्रजीमधून मिळू शकेल. त्याकरितां हे कूपन भरून (टपालखर्चासाठीं) १५ पैशांच्या स्टॅम्पसहित पुढील पत्त्यावर त्वरित पाठवा : मॅनर्स डेन्टल ॲडव्हायझरी ब्यूरो, पोस्ट बॅग क्रमांक १००३१, मुंबई १.

नांव ______________________ वय ________

पत्ता ______________________________

भाषा ______________________

## फोन्हान्स दंतवैद्याने निर्मिलेली टूथपेस्ट

65F-182MR

# कबड्डीचे आंतर-राष्ट्रीयत्व

दोन वर्षांपूर्वी इंदूरला मी अखिल भारतीय कबड्डी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. बी. एम्. राचप्पा यांची भेट घेतली होती. त्या वेळी कबड्डीचा खेळ आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचे आमचे प्रयत्न चालू आहेत अशी माहिती श्री. राचप्पा यांनी दिली. तूर्त सिलोन, ब्रह्मदेश, सिंगापूर अशा जवळच्या आशियाई राष्ट्रांत आम्ही प्रयत्न करणार आहोत असे ते म्हणाले. त्या गोष्टीला आज दोन वर्षे होऊन गेली पण हा खेळ आंतरराष्ट्रीय होण्याची चिन्हे तर सोडाच, पण तशा साध्या प्रयत्नांची वार्ताही कुठे वाचल्याचे स्मरत नाही.

कबड्डी खेळ आंतरराष्ट्रीय करण्याच्या त्या वल्गनाच ठरल्या. हे जरी खरे असले तरी तो राष्ट्रीय करण्याचे तरी काही प्रयत्न होत आहेत काय ? या बाबतीत सर्वत्र अनास्था आणि अव्यवस्थाच आढळून येते. कबड्डी खेळ महाराष्ट्रात स्फुरला, रुजला आणि फोफावला; पण त्या महाराष्ट्रात तरी त्याला व्यवस्थित वळण लागले आहे काय ? पण हा एक नव्या संशोधनाचाच विषय ठरेल !

पूर्वी रस्त्यावर विखुरला गेलेला कबड्डी आता क्रीडांगणावर सुसंघटित होऊ पाहत आहे. क्रीडांगणांची व्यवस्थित आखणी करण्यापासून ते मान्यवर व्यक्तींच्या हस्ते छानदार बक्षीस–समारंभ घडवून आणण्यापर्यंत या खेळाने ठिकठिकाणी मजल मारली आहे. आणि त्यासाठी असंख्य कार्यकर्ते किती झटतात तेही मी पाहिले आहे. पण हे सर्व बाह्यांग झाले. कबड्डीचे आकर्षण त्याने थोडेबहुत वाढले असेल. पण कबड्डीचे अंतर्बाह्य स्वरूप संपूर्ण बदलून टाकणे हीच आजच्या घडीची आत्यंतिक गरज आहे. त्याखेरीज तो आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्याची वाट तयार होणार नाही.

आक्रमकता आणि गतिमानता हा कबड्डीचा मूळ स्वभाव आहे. यंदाच्या वर्षी नागपूरला कबड्डीच्या राष्ट्रीय अंतिम फेरीत रेल्वे आणि महाराष्ट्र यामधील सामना तब्बल पन्नास मिनिटे खेळून कुणाचाही एकही गुण न होता अनिर्णित राहिला ! राष्ट्रीय पातळीवर असे रूक्ष आणि रसहीन सामने वारंवार होऊ लागले तर एक दिवस या धकाधकीच्या जीवनात होलपटून निघालेला प्रेक्षक या खेळापासून दूर होईल. कबड्डीचा चमकदारपणा वाढत गेला पाहिजे आणि त्याकरिता साध्या साध्या संघांतून तशी शिकवण दिली गेली पाहिजे. आणि त्याकरिता गेल्या पंधरा वर्षांत महाराष्ट्राकडून खेळलेल्या सुमारे दीडशे राज्य–खेळाडूंचा पुरेपूर उपयोग करून घेतला गेला पाहिजे. पण आज बघावे तो खेळाडूला काही किंमत दिसत

नाही. ही रड केवळ कबड्डीचीच नाही, तर बहुतेक खेळांत या संबंधी खेळाडूंच्या जोरदार तक्रारीच ऐकावयास मिळतात. याकरिता कबड्डीच्या संस्थांनी शिक्षण शिबिरासाठी जास्तीत जास्त विद्यार्थी–विद्यार्थिनींना कबड्डीचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यासाठी राज्य खेळाडू बोलाविले पाहिजेत. आज जुन्या खेळाडूंना सन्मानाने वागविले तर नव्या खेळाडूंवरही त्याची उत्तम छाप पडेल.

नुसत्या आक्रमक आणि वेगवान खेळाने कबड्डीचे आकर्षण वाढेल असे नाही तर त्यातील कसदारपणाही जरूर वृद्धिगत झाला पाहिजे. त्यासाठी सतत सराव आणि कबड्डीप्रमाणेच इतर व्यायाम प्रकारही हाताळले गेले पाहिजेत. काही कबड्डी खेळाडू धावणे, व्हॉलीबॉल किंवा बास्केटबॉल खेळणे, तालमीत जोर बैठका काढणे असे पूरक व्यायाम कबड्डीचा मोसम संपला की घेतात. महाराष्ट्रात किमान प्रत्येक जिल्ह्याचे असे दमदार आणि धारदार संघ तयार झाले तर त्यांमधील निमंत्रित संघाचे सामने निश्चितच उत्कृष्टपणे लढविले जातील.

कबड्डीचा खेळ आज मातीवर खेळला जातो. काही ठिकाणी तो लाकडी कोर्टस् किंवा रबरी कोर्ट्सवर खेळण्यास हरकत नसावी. बॅडमिंटनसाठी लाकडी आवरणे वापरली जातात. इंग्लंडमध्ये मुद्दाम तयार केलेली रबरी खेळपट्टी क्रिकेटच्या सरावाला वापरली जाते. अशा लाकडी किंवा रबरी कोर्टस्वर बूट-मोजे घालून आमचे कबड्डीपटू उतरू लागले तर त्याची शान अधिक वाढेल. पुण्या-मुंबईत आणि इतरत्र जे परदेशी पाहुणे येतात त्यांना अशा नव्या पोशाखाने आकर्षित करता येईल. महाराष्ट्राच्या माजी महिला कबड्डीपटू कु. रोहिणी जोशी या मागे अमेरिकेला गेल्या असताना त्यांनी तेथील कुटुंबात या खेळाचे सूतोवाच केले होते. त्या वेळी त्या अमेरिकन भगिनींना असा खेळ जगात कुठे असू शकतो याचेच मुळी नवल वाटले !

विजयी संघांना ढाली, कप देण्याची प्रथा सर्वत्र आहे. पण चमकदार खेळ करणाऱ्या कबड्डीपटूंना उत्कृष्ट बक्षिसे देण्याची परंपरा मोठ्या प्रमाणात सुरू झाली पाहिजे. त्यांना रोख बक्षिसे देऊन वैयक्तिक गतिमान आणि दर्जेदार खेळाला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. वैयक्तिक सन्मान वाढत गेले की खेळाडू स्वतःच अधिकाधिक क्लृप्त्या काढून आपल्या खेळाचे तंत्र प्रगत करतील. सदा शेट्टी, मधू पाटील, नरेंद्र दाभोळकर आणि बाळ कोंढाळकर असे चारच कबड्डीपटू इतके सामने पाहून माझ्या लक्षात राहिले आहेत. महिला खेळाडूत वासंती सातव, चित्रा नाबर, शैला रायकर आणि माधुरी पुसाळकर यांचीच आठवण राहिली आहे. याचे एक साधे कारण एवढेच देता येईल की, त्यांच्या खेळातील त्यांचे व्यक्तिमत्त्व वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्र आणि राष्ट्रीय संस्था याबाबतीत काही पुढाकार घेतील आणि कबड्डीला जागतिक पातळीवर नेण्यास मदत करतील, अशी अपेक्षा आहे. केवळ सरकारी पातळीवर हा प्रयत्न पुढे रेटण्याने विशेष फायदेशीर पडणार नाही, अशी माझी कल्पना आहे. ☐ ☐

— मनोहर रेगे

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचार्य

१९ जुलै ते २५ जुलै, १९६९

मेष : या आठवडचाचे एकमेव आकर्षण गुरु-हर्शल युती. असे योग क्वचित् केव्हातरी घडतात आणि म्हणूनच ते जीवनावर ठसा उमटेल असे काही अद्भुत कार्य करून जातात.

मंगळाची तीव्रताही आता कमी झालेली आहे. तुमच्या प्रगतीचा मार्ग रोखण्याचे साहस आता कोणीही करू शकणार नाही.

तुम्हांला साडेसाती आहे, पण साडेसातीची भीती कुणाला ? निर्बलांना. जगाने तुमच्यापासून कर्तृत्वाचे धडे घ्यावेत अशांना. कोणत्याही ग्रहापासून बाधा होऊ शकत नाही.

पुढे व्हा. यश तुमची प्रतीक्षा करीत आहे. आपल्या अनेक योजना या वेळी आकार घेऊ लागतील. बरीचशी कामे हातावेगळी होतील.

दि. २०–२४–२५ विशेषं क्रांतीचे दिवस.

वृषभ : बृहस्पती आणि प्रजापती यांचे वास्तव्य पंचमांत. ते तुम्हांला हवं ते द्यायला उद्युक्त आहेत. एवढे सामर्थ्य आपल्या पाठीशी उभे असल्यावर तुम्हांला आणखी काय हवे ?

याच आठवडयात मानवाची चंद्राशी भेट होणार आहे. विज्ञानाचा–मानवी कर्तृत्वाचा–हा महान विजय आहे. हे अनन्यसाधारण यश मिळविण्यात सिंहाचा वाटा या आठवडयातील गुरु–हर्शल युतीचाच आहे.

आपल्या वैयक्तिक जीवनातही अनेक क्रांतिकारक घटना घडून यायला लागतील. शैक्षणिक यश, वैज्ञानिक संशोधन, सांपत्तिक लाभ, या व अशाच स्वरूपाच्या अनंत प्रगत घटना या वेळी भराभर घडून यायला लागतील.

दि. २० ते २३ या काळाचे महत्त्व चिरस्मरणीय ठरेल.

**मिथुन :** तुमच्या जीवनात एक नवे पर्व निर्माण होत आहे. वर्षातून एकदाच तुमच्या राशीतून सूर्याचे भ्रमण होऊ शकते. ते होऊन गेल्यानंतर साऱ्या विवंचना, अडचणी दूर होतात व नव्या उत्साहानें जीवनाची वाटचाल सुरू होते. त्या दृष्टीने हा महिना आपणांस नवे काही करून दाखवण्यास उद्युक्त करणारा आहे.

गतकालीन व्यथा–विवंचना दूर होतील, आरोग्याबद्दलची चिंता मिटेल, सांपत्तिक प्रश्नही अपेक्षेप्रमाणे सुटू शकेल. याचा अर्थ हा सर्वोत्तम प्रगतीचा काल आहे, असा करू नका. गेल्या २–३ महिन्यांच्या मानाने हा काल अनुकूल व स्वास्थ्याचा आहे इतकेच.

दि. २२ ते २५ अपेक्षा सफल होतील.

**कर्क :** इतर ग्रह अनुकूल असोत वा नसोत, पराक्रमात गुरु-हर्शलची अंशात्मक युती एवढा एक योगही आपल्या कार्यात नेत्रदीपक यश द्यायला समर्थ आहे.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. तुम्हांपैकी काहींना एकाएकी परदेशास जाण्याचेही योग येतील. भाग्यात राहू. ही संधी आता अखेरचीच आहे.

नव्या योजना आकार येऊ लागतील, कर्तृत्वाचे क्षेत्रफळ विस्तारेल, कला–नाट्य या क्षेत्रांत काही नाव घेण्यासारखे कार्य करण्याची संधी लाभेल.

दि. २४ च्या रवि-गुरू लाभयोगापासून अनेक गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडून यायला लागतील.

**सिंह :** धनस्थानातील गुरु-हर्शल युतीवरच तुमचे सारे लक्ष केंद्रित झालेले आहे आणि माझी अशी खात्री आहे की, तो योग तुमचा अपेक्षाभंग करणार नाही.

सांपत्तिक लाभ चांगला होईल, हाती घेतलेले सर्व व्यवहार यशस्वी होतील. आपल्या कुटुंबातील प्रत्येकाला या वेळी त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुसार पुढे पाऊल टाकण्याची संधी लाभेल.

सूर्य व्ययस्थानी आल्याने फारसे काही बिघडण्यासारखे नाही. खर्चाचे मान वाढेल, पण प्राप्तीचे मानही बरेच उंचावेल.

दि. २० ते २४ या काळात तुमच्या प्रगतीचा आलेख निश्चितच उंचावू लागेल.

**कन्या :** सूर्य-बुध एकादशात असता तुमच्या राशीत गुरु-हर्शलची युती होत आहे. असा योग तुमच्या हयातीत पुन्हा कधीही होणार नाही.

मानवाची चंद्राशी भेटगाठ ही एक अनन्यसाधारण घटना याच आठवड्यात घडून येणार आहे. निसर्गावर मानवाचा हा विजयच.

आपल्या कर्तृत्वालाही उधाण येईल. ध्यानी मनी नसलेल्या अनेक आकर्षक योजना या आठवड्यापासून यश घेऊ लागतील. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. पैसा, यश, प्रतिष्ठा सर्व काही अपेक्षेबाहेर लाभेल.

दि २० ते २४ हा काल नोंद करण्यासारखा महत्त्वाचा जाणवेल.

**तूळ :** सध्याचे आपले ग्रहमान वरवर दिसायला अनिष्ट दिसले तरी निष्ठा-निर्धाराचे व्रत आचरणारांना कोणत्याही अनिष्टतेची बाधा होऊ शकत नाही, याचे साक्षात् उदाहरण म्हणजे तूळ राशी व्यक्ती.

अंगीकृत व्यवसाय प्रगतीकडे वाटचाल करू लागेल. सांपत्तिक विवंचना पूर्वी-इतक्या जाणवणार नाहीत. सभोवारचे वातावरण फारसे अनुकूल नसतानाही आपण आपल्या प्रतिष्ठेला धक्का लागू दिला नाहीत, यातच आपल्या दुर्दम्य आशा-वादाचे दर्शन घडते.

नव्या जबाबदाऱ्यांचे ओझे उचलावे लागेल. अनेक कामे निपटून काढण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल. पण असे असले तरी अपयशाचा डाग चुकूनही लागू शकणार नाही.

दि. २३ ते २५ या काळी अनेक अपेक्षा सफल व्हाव्यात.

**वृश्चिक :** भाग्यस्थानी सूर्य-बुध आणि लाभस्थानी गुरु-हर्शलची कधी तरी घडून येणारी युती. हे सारे ग्रहयोग आपणांस आवर्जून असे सांगत आहेत की, तुमचा उत्कर्षाचा, अपेक्षासाफल्याचा काल हाच.

कल्पना नसताना अनपेक्षित स्वरूपाचा लाभ पदरी पडेल, आपले व्यावसायिक क्षेत्र विस्तारेल. नवे स्नेहसंबंध निर्माण होतील. नोकरीधंद्यांतील अनेक प्रगतीचे टप्पे ओलांडले जातील.

यांत्रिक–विद्युत क्षेत्रात आजवर कधीही न लाभलेले यश मिळू शकेल. तुमची सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा येथूनच उंचावू लागेल. स्थावराचा व वाहनाचाही प्रश्न सहजासहजी सुटावा.

दि. २०-२२-२४ विशेष प्रगतीचा काल.

**धनू :** चौथ्या राहूची अनिष्ट कारकीर्द संपुष्टात येत आहे आणि याच वेळी गुरु–हर्शलचा नवा पर्वकाल सुरू होत आहे.

या महिन्यापासूनच आपल्या बऱ्याचशा विवंचना मिटू लागतील. नव्या व्यव-सायाला अनेक धनिकांचे साहाय्य लाभू शकेल. प्रकृती, पैसा आणि प्रतिष्ठा यांवर होणारे हल्ले आता बंद होतील आणि अभिनव, आकर्षक असे काही कार्य आपण करून दाखवू असा आत्मविश्वास निर्माण होऊ लागेल.

मंगलकार्याचा प्रश्न सुटू शकेल. नोकरीधंद्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरण्याची लक्षणे दिसू लागतील.

दि. २१ ते २४ या काली आपल्या अनेक योजना आकार घेऊ लागतील.

**मकर :** भाग्यात गुरू आला, तेव्हाच प्रगतीची प्रसादचिन्हे आपणांस दिसू लागली. या वेळी तर गुरु–हर्शलची अंशात्मक युती होत असल्यामुळे आपल्या

भाग्याला अक्षरशः उधाण यायला लागेल. आजवर आणि यापुढेही जीवनात कधीही न घडलेल्या अत्युत्तम प्रगतीच्या गोष्टी आता घडून याव्यात.

पृथ्वी आणि चंद्र यांचे जिवाभावाचे नाते होतेच. या वेळी त्यांचे परस्परांशी मीलन घडत आहे. चंद्रावर उतरणाऱ्या पहिला मानवाची राशी, मला वाटते, मकरच असावी.

तात्पर्य, आपल्या जीवनात चिरंतन स्मृतीच्या अनंत घटना या कालीच घडून यायला लागतील.

दि. २० ते २४ यातील प्रत्येक दिवस अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

**कुंभ :** अनेक ग्रह आपणांस अनुकूल आहेत. विशेषतः अंतरिक्षातील चंद्राशी आपले मीलन घडून येत असल्यामुळे आपल्या जीवनातील हा एक चिरंतन स्मृतीचा काल जाणवेल.

दगदग, धावपळ हा तर आपला स्थायीभावच! पण त्या साऱ्या परिश्रमांचे घवघवीत यश या वेळी आपल्या पदरी पडेल. सांपत्तिक ताण सहसा जाणवणार नाही. नोकरीधंद्यात तीव्र स्वरूपाच्या कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत.

कला–साहित्य–संशोधन क्षेत्रांत तर तुमचेच महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल. तुमच्या क्रान्तीचा मार्ग आता कोणाकडूनही रोखला जाणार नाही.

दि. २१ ते २४ नोंद करण्यासारखा काल.

**मीन :** सूर्य पंचमात आल्यामुळे आपला सर्व अनिष्ट काल भूतकालात जमा झाला, असे समजायला मुळीच हरकत नाही.

या वेळी अनेक ग्रहांचे आपणांस हार्दिक सहकार्य लाभणार असल्यामुळे आपल्या कार्यात आजवर कधीही मिळाले नसेल, असे अभूतपूर्व यश आपण मिळवून दाखवाल.

आरोग्य, स्वास्थ्य, प्रतिष्ठा या बाबतींतही आपली प्रगती वेग घेऊ लागेल. नवे करार–मदार होतील, नवे क्षेत्र हस्तगत होईल. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

दि. २२ ते २४ अत्युत्तम काल.

¤ ¤

---

**'झुंड' लेखांक वीस – कृपया पुढील अंकी – संपादक.**

---

## मुंबई समाचार [ पृष्ठ ६ वरून ]

जनतेची पक्की भावना झाली आहे. परंतु विदर्भासाठी कृषिविद्यापीठ मिळविण्याच्या एकमेव मार्ग म्हणजे वेगळे विदर्भ राज्य अशी भूमिका त्या आंदोलनात नव्हती; नव्हे ती प्रयत्नपूर्वक टाळण्यात आली. कृषि विद्यापीठ चळवळीत जनसंघासारखे संयुक्त महाराष्ट्रवादी पक्ष होते. तसेच नागविदर्भ आंदोलन समितीसारखे विदर्भवादी, तसेच संयुक्त महाराष्ट्रप्रेमी काँग्रेसजनही होते. विदर्भवादी मंडळींनी त्यानिमित्ताने लोकमताचा कल आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्नही केला, पण त्यात यशस्वी होण्यासारखी त्या नेत्यांची कुवतच नसल्यामुळे तो फसला.

दुसरे असे की, सरकारनेही त्या वेळी जास्त न ताणता जनभावनेचा आदर करण्याचे पुण्य पदरात पाडून घेण्याची चतुराई दाखविली आणि एके दिवशी मा. यशवंतराव चव्हाण ज्याप्रमाणे महाराष्ट्राचा मंगल कलश घेऊन दिल्लीहून परतले तसे श्री. वसंतराव नाईक कृषिविद्यापीठाचा कलश ('मंगल' मुद्दामच म्हणत नाही. कारण विदर्भातील जनता तो कलश हुतात्म्यांच्या रक्ताने भरलेला होता असे मानते.) घेऊन नागपुरात आले आणि चळवळ शांत झाली. स्वतंत्र विदर्भाची भावना जर येथील जनतेच्या मनात खोलवर रुजली असती तर ती चळवळ थंडावली नसती. म्हणून त्या चळवळीला वेगळ्या विदर्भाच्या मागणीसाठी आधार समजणे (?) चूक होईल.

या विवेचनाचा अर्थ मात्र असा नाही की, विदर्भात सर्व आलबेल आहे. तेथील जनतेच्या अंतःकरणात अनेक व्यथा आहेत. महाराष्ट्र राज्यात आपल्याला वेगळ्या प्रकारची वागणूक मिळते असा न्यूनगंड येथील जनतेत निर्माण होत आहे. विकासाची मंद गती, नोकऱ्यांत मिळणारी अल्प संधी, मोठ्या प्रमाणावर नोकरकपात आदी कारणांमुळे व्यापार क्षेत्रापासून तो कामगार क्षेत्रापर्यंत असंतोष धुमसत आहे. कृषिविद्यापीठ मिळाल्यामुळे असंतोषाची ही वाफ एकवेळ निघून गेली परंतु ती पुन्हा निर्माण होणारच नाही हे कुणी सांगावे !

विदर्भ राज्यासाठी अनुकूल मने असतानासुद्धा ही चळवळ मूळ न धरण्याची काही कारणे आहेत. पहिले म्हणजे कमकुवत नेतृत्व. या चळवळीचे आजचे जे नेतृत्व आहे ते एवढे कमकुवत आणि संधिसाधू आहे की, त्याच्या भरवशावर आपली मागणी पूर्ण होईल असे सामान्य नागरिकाला वाटत नाही. मध्यंतरी 'पेपरवेट फेम' आमदार जांबुवंतराव धोटे या चळवळीत आले आणि ती आता फोफावेल असे वाटले. पण श्री. धोटे यांचा या चळवळीत शिरण्याचा उद्देश लोकांच्या लक्षात आला. तो म्हणजे त्यांच्या यवतमाळमधील राजकारणाला मिळालेला शह.

दुसरे कारण म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या सूत्रचालकांनी, – म्हणजे श्री चव्हाण यांनी – एक गोष्ट ओळखली व ती म्हणजे विदर्भांतील काँग्रेस नेत्यांना संतुष्ट

राखणे. आज राज्याच्या मुख्यमंत्र्यांसहित अनेक महत्त्वाच्या पदांवर विदर्भातील काँग्रेस कार्यकर्त्यांची वर्णी लागलेली आहे. अशा प्रकारे सत्तास्थाने मिळून संतुष्ट झालेल्यांचा गट बहुसंख्येने आहे. या गटातील खालच्या कार्यकर्त्यांनाही पदे मिळाली आहेत, कुणाला अद्याप आशा आहे. त्यामुळे तेलंगणाची चळवळ जशी फुटीर काँग्रेसजनांनी चालविली तशी स्थिती विदर्भात नाही; म्हणून जोपर्यंत ही सत्तास्थाने वैदर्भियांच्या हातात आहेत तोपर्यंत तरी वेगळ्या विदर्भाची चळवळ फोफावणे शक्यच नाही. उलटपक्षी, राज्यसभेचे सदस्यत्व मिळण्याच्या आशेने विदर्भ चळवळीला रामराम ठोकणाऱ्या देशमुखांसारख्या मंडळींची संख्या मात्र वाढत जाणार.

या पार्श्वभूमीवर एक गोष्ट स्पष्टपणे नजरेस आली पाहिजे व ती म्हणजे आज विदर्भ जो महाराष्ट्रात आहे तो तेथील जनतेच्या महाराष्ट्रप्रेमामुळे नव्हे ! उद्या वैदर्भीय काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हातची मंत्रिपदे जाऊ द्यात, म्हणजे आजचे संयुक्त महाराष्ट्रवादी मंत्री उद्या विदर्भाचा झेंडा हाती घेतील आणि मंगल कलश आणण्याचे श्रेय घेऊन पुन्हा मंत्रिपदांच्या अडण्यांवर बसायला मुळीच संकोच करणार नाहीत. ⌑ ⌑


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा ! फोंडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

**आठ शिवकालीन कथा**

ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

# चेटकिणीवर मात

अनंत भावे

एका गावात एक बाई राहत होती. तिला एक मुलगा होता. आपल्या मुलासारखा सुंदर मुलगा त्रिभुवनात नाही, असे तिला वाटे. यात आश्चर्यकारक काहीच नाही; कारण, प्रत्येक आईलाच तसे वाटत असते. परंतु या बाईला मात्र आपले मत सगळ्यांना सांगत बसण्याची वाईट खोड होती. अनेकांनी तिला यापासून परावृत्त करण्याचा यत्न केला; पण तिने कोणाचे ऐकले नाही.

एके दिवशी ती करवंदे वेचायला डोंगरावर गेली होती. बरोबर अर्थात तिचा मुलगा होताच. डोंगरावर एके ठिकाणी करवंदाच्या अमाप जाळ्या होत्या. जवळच सपाट, हिरव्यागार जमिनीच्या तुकड्यावर तिने मुलाला ठेवले आणि ती आसपासची करवंदे तोडू लागली. पण करवंदे तोडण्याच्या



नादात ती खूप दूर गेली. इतक्यात तिच्या कानांवर मुलाच्या रडण्याचा फार चमत्कारिक आवाज पडला. तिच्या छातीत धस्स झाले. ती मुलाच्या दिशेने धावत सुटली.

तिचा मुलगा चमत्कारिक आवाजात रडत होता. रडून रडून त्याचे डोळे सुजले होते. बाईने त्याला शांतवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याचे रडे थांबेना. त्याला घेऊन ती कशीतरी घरी आली.

तिचा मुलगा आता सारखा रडूच लागला. फक्त ती जेव्हा त्याला खायला घाली त्या वेळी तो गप्प असे आणि त्याला खा-खा सुटली होती. कितीही खाल्ले तरी त्याचे समाधानच होत नसे. पुन्हा आपला तो खायला मागे, आणि ते मिळाले नाही की, रडत बसे.

आणि विचित्र गोष्ट अशी की, खाल्लेले त्याच्या अंगीही लागत नसे. त्याचे सुंदर रूप वेडेविद्रे झाले होते. सर्व शरीर सुकून जाऊन त्यावर सुरकुत्या पडल्या. हातापायांच्या काड्या झाल्या. डोळे निस्तेज झाले. आणि त्याचा मूळचा खेळकर, आनंदी स्वभाव जाऊन आता तो अखंड किरकिर करू लागला.

बाईला त्या मुलाची एक प्रकारची भीती वाटू लागली. घरी येणाऱ्या माणसांनासुद्धा त्या मुलात काही तरी चमत्कारिकपणा जरूर आढळे. पण त्याचा उलगडा त्यांना झाला नाही. एके दिवशी गावसीमेवर एकटीच राहणारी म्हातारी तिच्याकडे आली होती. या म्हातारीला पांढरी, दुसऱ्याचे भले करणारी चेटुकविद्या अवगत आहे, असा तिचा लौकिक होता. मुलगा तिने पाहिला मात्र, ती एकदम म्हणाली, “बाई, हा तुझा मुलगा नाही. तुझा मुलगा चेटक्यांनी पळवला आणि हा त्याच्यासारखा दिसणारा चेटकी मुलगा तुझ्यापाशी ठेवला.”

हे ऐकताच ती बाई धाय मोकलून रडू लागली. म्हातारी तिला म्हणाली, “मला वाटतं आपल्या मुलाचं सारखं कौतुक करण्याची वाईट खोड असणार तुला !”

“होय आजीबाई, चूक झाली माझी.”

“ते कौतुक चेटक्यांनी ऐकलं आणि चांगली अद्दल घडवली तुला.”

“पण आजीबाई यावर काहीच का उपाय नाही. माझा मुलगा परत नाही का मिळणार ?”

" अग वेडे, ज्यावर उपायच नाही अशी अवघड गोष्ट या दुनियेत नाही. आता मी सांगते तसं कर. डोंगरावर जा आणि ज्या जागी मुलाला ठेवलं होतंस तिथलं गवत उपटून आण थोडं. आणि ज्या दुपट्यावर मुलगा ठेवला होतास ते दुपटं पण दे मला. मग पाहते मी तुझा मुलगा कसा परत मिळत नाही ते. "

बाई धावत डोंगरावर गेली, आणि तिने सांगितल्याप्रमाणे पुष्कळ गवत उपटून आणले. म्हातारीने गवताची मुलाच्या आकाराची जुडी तयार केली. ती जुडी त्या दुपट्यात गुंडाळून तिने मांडीवर घेतली. त्यापूर्वीच चूल पेटवून त्यावर तिने मोठ्या हंड्यात पाणी उकळत ठेवले होते. एक भला मोठा लाकडी चमचा घेऊन ती पाणी ढवळत होती, आणि ढवळता ढवळता गाणे म्हणत होती :

**उकळ पाणी । गाते गाणी । 'बाळाला आणा कोणी'**

**लाकूड-चमचा । बहुत गुणाचा । रक्षम आमच्या बाळाचा**

प्रथम संथपणे आणि नंतर द्रुत लयीत म्हातारी गाणे म्हणू लागली. पाणी उकळले होते. एकदम कसलातरी आवाज झाला आणि म्हातारीने मांडीवरचे गवताचे मुटकुळे हंड्यात टाकले ! त्याबरोबर पाळण्यातील त्या चेटकी मुलाने भयंकर आक्रोश केला. जणू त्यालाच कोणी उकळत्या पाण्यात टाकले होते. इतक्यात दरवाजा उघडला. दरवाजात एक भयंकर चेटकीण उभी होती. आत येऊन तिने पाळण्यातील मूल उचलले, पाळ-ण्यात बाईचे मूल ठेवले आणि वेगाने ती निघून गेली. जाताना तिने चुलीवरच्या हंड्याला चिडून लाथ मारली. हंड्यातील पाणी घरभर झाले.

बाईने मुलाला छातीशी घट्ट कवटाळले. तिच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या.

त्या दोघांकडे म्हातारी कौतुकाने पाहत होती. नंतर ती म्हणाली, " आता पुन्हा आपल्या मुलाबद्दल फार बोलू नकोस. चेटक्या ऐकतील कदाचित ते. त्यांचे कान फार लांब असतात. " असे म्हणून आपल्या विनोदावर खुश होऊन ती मोठ्याने हसली. म्हातारीच्या हसण्याला मुलानेही मंद हसून प्रतिसाद दिला. अर्थात त्याला काही कळत होते, असे मानण्याचे कारण नाही. [ आधारित ]

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649




“ पुस्तकं मिळत नाहीत, आता अभ्यासाचं काय करायचं अशी तक्रार घेऊन येणाऱ्या पालकांना, शिक्षकांना न् विद्यार्थ्यांना मी असा बदल मनांत ठसवायला सांगतो . . . ! ”

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**